




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १२१ * नांदेड * गुरुवार, दि. ८ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# ऑपरेशन सिंदूर : पाकिस्तानवर हवाई हल्ला, ९ दहशतवादी तळं उद्धवस्त

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारतातील २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. भारताने या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेत पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून आहे. भारताने शेजारी देशासह सुरू असलेल्या या तणावादरम्यान बुधवारी मध्यरात्री पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्रे डागली आहेत. भारतीय सैन्याने पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या १५ दिवसांनी ही कारवाई केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले आहेत. ही तीच ठिकाणे आहेत, जिथून भारतावर दहशतवादी हल्ले करण्याचे निर्देश दिले गेले होते. भारतीय सैन्य दलाकडून 'ऑपरेशन सिंदूर' नुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

भारतीय सैन्य दलाच्या ऑपरेशन सिंदूरअंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईनंतर पाकिस्तान हादरलं आहे. भारताने मुजफ्फराबाद, कोटली आणि बहावलपूरमध्ये मोठा क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. पाकिस्तानी माध्यमांच्या दाव्यानंतर काही वेळातच भारत सरकारनेही या हल्ल्याची अधिकृतपणे पुष्टी केली.

भारतीय सैन्य दलाकडून हवाई हल्ल्याआधी सोशल मीडियावरुन एक पोस्ट करण्यात आली होती. प्रहाराय सन्निहिताः, जयाय प्रशिक्षिताः आणि Ready to Strike, Trained to Win, अशा आशयाची पोस्ट करण्यात आली होती. त्यानुसार काही वेळातच पहलगाम हल्ल्याचा हिशोब चुकता केला जाणार असल्याचं स्पष्ट झालं होतं. सैन्य दलाने केलेल्या या कारवाईचं आता सर्वच स्तरातून कौतुक केलं जात आहे.

दरम्यान पहलगाममध्ये २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर धर्म विचारुन गोळीबार केला होता. त्या भ्याड हल्ल्यानंतर भारतात संतापाची लाट होती. पाकड्यांना जशास तसं उत्तर द्यावं, अशी मागणी भारतीयांची होती. अखेर भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानवर हवाई हल्ला करत शेजाऱ्यांच्या नांग्या ठेचल्या आहेत.

दरम्यान भारताकडून पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानमधील कलाकार आणि क्रीडापटूंच्या सोशल मीडिया खात्यांवर भारतात बंदी टाकण्यात आली.

# राज्यात अव्वलस्थानी : नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा सन्मान

## पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय राज्यात दुसरे तर जिल्हाधिकारी नांदेड कार्यालय राज्यात पाचवे







**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व कार्यालयांना १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात नांदेड जिल्ह्याने चांगले कार्य करून त्या-त्या विभागात अव्वल स्थान मिळविले आहे. याबद्दल नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा बुधवारी सन्मान करण्यात आला.

जिल्ह्याच्या पोलीस प्रशासनाने १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात नांदेड पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल महसूल व पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केल्या जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शंभर दिवसाच्या सुधारणा कार्यक्रमात विविध सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते. यात नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्वोत्तम कामगिरी बजावत राज्यात पाचवा क्रमांक पटकाविला. या कामगिरीबाबत बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्रिमंडळ सदस्यांच्या उपस्थितीत गुणगौरव सोहळयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनात गेल्या काही दिवसांत कार्यालयाचे रूप पालटले आहे. ई-फायलिंग पासून तर नागरिकांना तातडीने प्रतिसाद देण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यात आली आहे. याशिवाय या कार्यालयातील अंतर्गत स्वच्छता व नीटनेटकेपणा यासाठी अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष घातले आहे. याची नोंद गेल्या महिन्यांत तपासणी करता आलेल्या तटस्थ पथकाने देखील घेतली होती. विशेष म्हणजे विभागात हा पुरस्कार नांदेड जिल्ह्याला मिळाला आहे. शंभर दिवसांच्या उपक्रमात एक टीम बनून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या कामाला हा पुरस्कार मिळाला आहे.

मंत्रालयात मंत्रिमंडळ कक्षात झालेल्या या पुरस्काराच्या वेळी मुख्यमंत्र्यांसोबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विविध विभागाचे मान्यवर उपस्थित होते. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात ९ विभागांतील प्रथम क्रमांक आलेल्या कार्यालयांनी सादरीकरण केले. यावेळी गुणानुक्रमे सर्वोत्तम कामगिरी केलेल्या पहिल्या ५ क्रमांकाने आलेल्या सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वोत्तम जिल्हाधिकारी, सर्वोत्तम पोलीस अधिक्षक, सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त, सर्वोत्तम पोलीस आयुक्त, सर्वोत्तम पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक, सर्वोत्तम विभागीय आयुक्त, सर्वोत्तम आयुक्त, संचालक यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. **(पान ६ वर...)**

## ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानमध्ये हाय अलर्ट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम जिल्ह्यात २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निरपराध पर्यटकांवर बेछूट गोळीबार करत ठार करण्यात आलं. त्यानंतर भारताने बुधवारी पाकिस्तानच्या ९ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ला करत दहशतवाद्यांचा खात्मा केला. या हल्लयाला ऑपरेशन सिंदूर म्हटले गेले. या घटनेनंतर जगभरातील देशांचे लक्ष भारत आणि पाकिस्तानवर आहे. दोन्ही देशांमध्ये आता प्रचंड तणाव असून ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानात हाय अलर्ट जारी करण्यात आला.

## पाकिस्तानकडून सीमेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन, भारतीय सैन्याच्या गोळीबारात १० पाकिस्तानी जवान ठार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताने पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार करण्यासाठी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानच्या पायाखालची वाळू सरकल्याच दिसत आहे. हडबडलेल्या पाकिस्तानच्या सैन्याने आता सीमेवर शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं आणि भारतीय सैन्यावर गोळीबार केला. त्यामध्ये दहा भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला. भारताने दिलेल्या प्रत्युत्तरामध्ये १० पाकिस्तानी जवान ठार झाले आहेत.

पहलगाम हल्ल्याचा बदला घेऊन भारताने पाकिस्तानच्या नऊ दहशतवादी तळांवर हल्ला केला. त्यानंतर सीमेवर परिस्थिती चिघळू नये अशी इच्छा आहे. परंतु पाकिस्तानने तणाव वाढवला तर त्याला निर्णायक उत्तर देणार असल्याचं भारताने आधीच स्पष्ट केलंय. आताही सीमेवर पाकिस्ताने केलेल्या गोळीबाराला उत्तर देताना भारताने पाकिस्तानच्या १० जवानांना ठार केलं आहे.

भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला असून पाकिस्तानात १०० किमी आत घुसून दहशतवादी तळ उद्धवस्त केले. भारताने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर मध्यरात्री जोरदार आक्रमण केलं. दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्धवस्त करून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली.

या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. भारतीय सेनेनं या मोहिमेत बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद या तीन शहरांमधल्या केवळ अतिरेक्यांच्या तळांवर अचूक लक्ष्य साधलं. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सेनेनं बहावलपूरमध्ये जैश ए मोहम्मदचं हेडक्वार्टर उद्धवस्त केलं.

## कॉपी प्रकरणात कंधार येथील अध्यापक महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ या परीक्षा चालू आहेत. कंधार (बाळंतवाडी) येथील अध्यापक महाविद्यालया मध्ये कंधार फार्मसी कॉलेजचे बी.फार्मसी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी परीक्षा देत होते. सदर परीक्षा केंद्रावर ७ मे रोजी विद्यापीठाचे विशेष कार्यासन अधिकारी, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता, पीपल्स महाविद्यालयाचे डॉ. अमोल काळे यांनी अचानकपणे परीक्षा केंद्रास भेट दिली. या दरम्यान परीक्षा केंद्रावर सर्व विद्यार्थी बिनधास्त कॉपी करत असताना आढळले. ही बाब अत्यंत गंभीररित्या कुलगुरू यांनी घेतली आहे. आणि तात्काळ सदरचे परीक्षा केंद्र रद्द केले आहे.

सदर कारणामुळे कुलगुरू यांच्या आदेशान्वये कंधार (बाळंतवाडी) येथील अध्यापक महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र रद्द करण्यात आले आहे. यामुळे दि. ८ मे पासून कंधार येथील फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही लोहा येथील डी.के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे घेण्यात येणार आहे.

याबाबतची विद्यार्थ्यांनी बदल लक्षात घेऊन दि. ८ मे पासून लोहा येथील डी.के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे उपस्थित राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

## रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून केली निवृत्तीची घोषणा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. हिटमॅन म्हणून ओळखला जाणाऱ्या रोहितने बुधवार ७ मे रोजी सोशल मीडियावर पोस्ट करत कसोटी क्रिकेटला रामराम ठोकला. रोहितच्या निवृत्तीची बातमी अशा वेळी आली जेव्हा निवड समितीने त्याला कसोटी संघाच्या कर्णधारपदावरून काढून टाकण्याचा निर्णय घेणार होती आणि इंग्लंड दौऱ्यावर त्याला संघात स्थान मिळण्याची शक्यताही दिसत नव्हती. गेल्या काही महिन्यांपासून रोहित शर्माच्या कसोटी क्रिकेटमधील भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात होते. विशेषतः त्याचे कर्णधारपद धोक्यात होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महापालिका प्रशासनाने घेतली आढावा बैठक


**नांदेड (प्रतिनिधी)–** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी निवडणूक आयोगाला आदेश देताना चार महिन्यांत या निवडणुका घेण्यात याव्यात, असे स्पष्ट केले आहे. चार आठवड्यात या निवडणुकांची अधिसूचनाही प्रसिद्ध करावी, असे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे आता लोकनियुक्त कारभाऱ्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर नांदेड जिल्ह्यात प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने नांदेडमहापालिकेच्याअधिकाऱ्यांची तातडीची बैठक मंगळवारी घेण्यात आली. आता प्रभाग रचनेसह मतदार यादी अंतिम करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

नांदेड जिल्ह्यात जिल्हा परिषद, १६ पंचायत समिती, नांदेड महापालिका यासह १३ नगरपालिकांच्या निवडणुका रखडल्या आहेत. नांदेड जिल्हा परिषदेचा कार्यकाळ २१ मार्च २०२१ रोजी संपुष्टात आला आहे. त्यानंतर २२ मार्च २०२१ पासून येथे प्रशासकीय राजवट सुरू आहे. आतापर्यंत तीन मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रशासकीय काळात कार्यरत राहिले आहेत. त्याचवेळी नांदेड महापालिकेचा कार्यकाळ ऑक्टोबर २०२२ मध्ये संपला आहे. येथे १ नोव्हेंबर २०२२ पासून प्रशासकीय राज सुरू आहे. जिल्ह्यातील भोकर नगरपालिकेचा पाच वर्षांचा कार्यकाळ उलटला आहे. तर अर्धापूर, माहूर आणि नायगाव नगरपंचायती वगळता इतर सर्वच नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका रखडल्या आहेत. आता या सर्व निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. या संदर्भाने सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले असून आगामी चार महिन्यांत निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे दिवाळी मध्ये लोकनियुक्त कारभारी या स्थानिक स्वराज्य संस्थांवर पुन्हा एकदा कारभार करू लागतील, अशीच चिन्हं आहेत.

एकूण परिस्थिती पाहता स्थानिक स्वराज्य संस्थां मध्ये जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आधी होतील, अशी अशीच चिन्हे आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती गट, गणांची रचना साधारणतः निश्चित असते. वार्ड अथवा प्रभाग रचनेबाबत पुन्हा एकदा राज्य सरकारच्या पातळीवर अंतिम निर्णय होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आधी होतील आणि त्यानंतर महापालिकेच्या तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील, अशी चिन्हं आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका त्यासह महापालिका निवडणुकीसाठी अनेक इच्छुकांनी तयारी सुरू केली होती, मात्र निवडणुकाच घोषित होत नसल्याने पूर्ण तयारीनिशी हे इच्छुक मैदानात उतरले नव्हते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हे सर्व इच्छुक आणि भावी उमेदवार मैदानात उतरणार आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# यह तो केवल झांकी है!

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे नुकताच झालेला दहशतवादी हल्ला हा मानवतेच्या विरोधात घडलेला अमानवी, संतापजनक प्रकार होता. पर्यटकांनी गजबजलेल्या परिसरात झालेल्या या हल्ल्याने देशभरात भीती आणि रोषाची लाट उसळली. निष्पाप नागरिकांच्या जीवावर उठणाऱ्या या अमानुष कृत्यांमुळे भारताच्या संयमाचा अंत झाला आणि संपूर्ण देश 'या रक्ताची किंमत मोजलीच पाहिजे' या भावनेने पेटून उठला. हा हल्ला केवळ सुरक्षेचा भंग नव्हता, तर भारताच्या सार्वभौमत्त्वाला दिलेले थेट आव्हान होते. या पार्श्वभूमीवर, भारतीय लष्कराने घेतलेली हालचाल ही तितकीच निर्णायक, जोरदार आणि नियोजनबद्ध होती. विशेष माहितीच्या आधारे नव्या पद्धतीने छुपा शिरकाव करणाऱ्या सुमारे शंभर दहशतवाद्यांचा शोध घेऊन त्यांचा खात्मा करण्यात आला. हे दहशतवादी वेगवेगळ्या हेअरस्टाईल, पेहराव, आणि व्यक्तिमत्त्व बदलून भारतात घुसखोरी करत होते. त्यांचे बेमालूम मिश्रण हे केवळ सुरक्षादलांसाठी नव्हे, तर सामान्य नागरिकांसाठीही मोठा धोका होता. अशा दुर्दम्य कारवाईने लष्कराने स्पष्टपणे दाखवून दिले आहे की, भारत आता केवळ सहन करणारा देश राहिलेला नाही, तर योग्य वेळी योग्य प्रत्युत्तर देणारे राष्ट्र बनले आहे. ही कारवाई अनेक भारतीयांच्या मनातील सूडभावनेला थोडा तरी दिलासा देणारी आहे. सोशल मीडिया, चहाच्या गप्पा, तरुणांच्या चर्चासत्रात वारंवार असा सूर ऐकू येतो की, पाकिस्तान नामक देश पृथ्वीवरून नाहीसा झाला पाहिजे. या मागे फक्त देशभक्ती नाही, तर वर्षानुवर्षे सहन केलेली दहशतवाद्यांची कृत्ये, जवानांचे बलिदान, आणि सामान्य नागरिकांची कायमची असुरक्षितता आहे. जनतेचा रोष रास्त आहे, पण या सूडाच्या आगीत काय आणि किती होरपळतंय, हेही पाहणं तितकंच गरजेचं आहे. या घटनेचे जागतिक पडसादही उमटू लागले आहेत. चीनने पुन्हा एकदा पाकिस्तानच्या बाजूने उभं राहत भारताविरोधात अप्रत्यक्ष भूमिका घेतली आहे. ही कृती केवळ भारतासाठीच नव्हे, तर जागतिक शांतीसाठीही चिंता निर्माण करणारी आहे. चीनचा हा पवित्रा जागतिक राजकारणात भारतविरोधी समीकरण तयार करू शकतो. परंतु त्याच वेळी जपान, रशिया आणि इजराइलसारख्या सामर्थ्यवान राष्ट्रांनी भारताला खुला पाठिंबा दिला आहे. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय स्थिती बळकट होत आहे आणि पाकिस्तानवर आर्थिक, कूटनीतिक दडपण वाढत आहे. या साऱ्या घडामोडींमध्ये एक गंभीर आणि वास्तववादी बाजू दुर्लक्षित केली जाऊ नये, ते म्हणजे युद्धाचे परिणाम. युद्ध हे केवळ लष्करांमधील संघर्ष नसतो; त्याचे खरे दुष्परिणाम भोगावे लागतात ते सामान्य जनतेने, सीमावर्ती गावांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी, रोजंदारी करणाऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी, वृद्धांनी आणि महिलांनी. बॉम्बस्फोट, स्थलांतर, अन्न व पाण्याचा तुटवडा, औषधांचा अभाव हे युद्धाचे काही टोकाचे चेहरे आहेत, जे नजरेआड राहतात. पाकिस्तान पूर्ण उद्ध्वस्त व्हावा, अशी भावना अनेकांच्या मनात आहे, आणि ती कोणत्याही देशावर पुन्हा हल्ला करण्यापूर्वी हजारदा विचार करण्यासाठी कारणीभूत ठरू शकते. पण ही भावना जर अनियंत्रित राहिली, तर ती आपल्यालाच घायाळ करू शकते. युद्ध केवळ एकदा लढलं जातं, पण त्याचे परिणाम अनेक दशकं भोगावे लागतात. याचे उदाहरण म्हणून आपण १९७१ चं भारत-पाकिस्तान युद्ध पाहू शकतो. तेव्हा जिंकूनही आपण अनेक बाबतींत हरलो, विशेषतः माणुसकीच्या आणि अर्थव्यवस्थेच्या पातळीवर. दहशतवाद हा संपला पाहिजे, हे निर्विवाद सत्य आहे. पण तो संपवण्यासाठी आवश्यक असलेली रणनीती ही संयम, कुशल गुप्तचर व्यवस्था, आंतरराष्ट्रीय दबाव, आणि शस्त्रबळ यांचं संतुलित मिश्रण असावे लागते. शत्रूच्या घरात घुसून मारा करणं ही एक बाजू आहे, पण शत्रूच्या विचारधारेवरच आघात करणे अधिक शाश्वत उपाय आहे. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, 'बदला' हे ध्येय नसून 'शांतता' हे अंतिम उद्दिष्ट आहे. पण जिथे पर्याय नसते त्या ठिकाणी शांतता प्रस्थापित करण्यासाठी युद्धाची गरज असते, हेच आपल्याला महाभारतातील युद्धात भगवान श्रीकृष्णाने समजावून सांगितले आहे. आपल्या मूल्यांची जपणूक करून, आणि प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षित भविष्यासाठी केलेली ही कार्यवाही अत्यंत स्तुत्य अभिनंदन आणि दिलासादायक आहे.भारताने आपली ताकद दाखवून दिली आहे. आता गरज आहे ती तीव्र भावना आणि थंड डोकं यांचं संतुलन राखण्याची. पाकिस्तानला पूर्णपणे नष्ट केलेच पाहिजे, परंतु पूर्ण नियोजन करूनच हे देखील सर्वसामान्यांना मान्य आहे.

# आपत्तीत सापडलेल्यांना आधार म्हणजे 'रेडक्रॉस'



रेडक्रॉस ही एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था गरजूंना आपातकाळी सेवा देते. ही संस्था रुग्ण, युद्धात घायाळ, नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकले असलेल्या लोकांना जीवनदान देण्याचे तसेच घायाळांवर वैद्यकीय उपचार करून त्यांना मदत करण्याचे कार्य करते. रेडक्रॉस मोहिमेचे जन्मदाते जीन हेन्री ड्यूनेन्ट यांचा जन्म दि.८ मे १८२८ रोजी झाला. त्यांच्या जन्मदिन संपूर्ण विश्वात रेडक्रॉस दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक रेडक्रॉस दिनाला आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन म्हणून देखील साजरा केला जा-तो. ही संस्था तब्बल दीडशे वर्षांपासून काम करीत आहे. ही संस्था नैसर्गिक आणीबाणी प्रसंगी अडकलेल्या गरजूंना आपली निःस्वार्थ सेवा देत असते.

भारतात इ.स.१९२०मध्ये पार्लियामेंट्री एक्टच्या अंतर्गत भारतीय रेडक्रॉस समितीचे गठन केले गेले. तेव्हापासून रेडक्रॉसचे स्वयंसेवक आ-पली निःस्वार्थ सेवा देत आहेत. विश्वाचे तब्बल दोनशे देश एकाच विचारांवर ठाम आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संस्था नैसर्गिक आपदांमध्ये अडकलेल्या लोकांना तसेच युद्धामध्ये घायाळ झालेल्या वीरांना मदतीचा हात देऊन त्यांना यथोचित साहाय्य करतात. रेडक्रॉस ही एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था गरजूंना आपातकाळी सेवा देते. ही संस्था रुग्ण, युद्धात घायाळ, नैसर्गिक आ-पत्तीमध्ये अडकले असलेल्या लोकांना जीवनदान देण्याचे तसेच घायाळांवर वैद्यकीय उपचार करून त्यांना मदत करण्याचे कार्य करते. रेडक्रॉस मोहिमेचे जन्मदाते जीन हेन्री ड्यूनेन्ट यांचा जन्म दि.८ मे १८२८ रोजी झाला. त्यांच्या जन्मदिन संपूर्ण विश्वात रेडक्रॉस दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक रेडक्रॉस दिनाला आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन म्हणून देखील साजरा केला जा-तो. ही संस्था तब्बल दीडशे वर्षांपासून काम करीत आहे. ही संस्था नैसर्गिक आणीबाणी प्रसंगी अडकलेल्या गरजूंना आपली निःस्वार्थ सेवा देत असते.

रेडक्रॉसचा मुख्य उद्देश्य रुग्णाची, युद्धामध्ये घायाळ झालेल्या लोकांची सेवा करणे आहे. सन १९१९पासून रेडक्रॉस म ानवाचा त्रास कमी करण्याकडे विशेष लक्ष देत आहे. हेन्रीने सेवाकार्यात वाहिलेल्या या समितीला रेडक्रॉस नाव दिले. या समितीची ओळख पटण्यासाठी एका पांढऱ्या पट्टीवर लाल रंगाच्या क्रॉस चिन्ह-ाला मान्य करण्यात आले. आता हे चिन्ह संपूर्ण विश्वात मानवास समर्पित निःस्वार्थ सेवाभाव म्हणून ओळखले जाते. पांढऱ्या शुभ्र पार्श्वभूमीवर अधिक चिन्हासारखी तांबडी फुली हे या संघटनेचे बोधचिन्ह असून त्यावरूनच संघटनेचे 'रेडक्रॉस' हे नाव पडले आहे. द्यूनां हे स्वत्झर्लंडचे नागरिक असल्याने त्या देशाच्या सन्म ानार्थ त्याच्या तांबड्या पार्श्वभूमीवरील पांढरी फुली असलेल्या राष्ट्रध्वजावरच्या रंगांची अदलाबदल करून हे चिन्ह तयार करण्यात आलेले आहे. इस्लामी राष्ट्रांत तांबड्या फुलीऐवजी पांढऱ्या पार्श्वभूमीवर चंद्रकोर- रेडक्रेसेंट तर इराणमध्ये उगवता तांबडा सूर्य व सिंह- रेड लायन अँड सन तर इस्राईलमध्ये तांबडा डेव्हिडचा तारा असा या बोधचिन्हात बदल केलेला आहे. हे बोधचिन्ह असलेली वाहने, इमारती तसेच ते धारण करणाऱ्या व्यक्ती यांच्यावर गोळीबार, बाँबफेक अथवा हल्ला करू नये, असेही ठरविण्यात आलेले आहे. अर्थात अशा वाहनांत वा इमारतींत युद्धसाहित्य अथवा सैनिक असता कामा नये. अशा प्रकारे संरक्षण योग्य ठिकाणे व व्यक्ती ओळखू येण्यासाठी हे चिन्ह वापरतात. आता तर हे चिन्ह वैद्यकीय व्यवसायाचेही निदर्शक झाले आहे.

सध्याच्या काळात १८६ देशांम ध्ये रेडक्रॉस समिती कार्य करीत आहे. सन १९०१ साली हेन्री ड्यूनेन्ट यांना त्यांच्या सेवाभावास पहिले नोबल शांती पारितोषिक देण्यात आले. विश्वाची पहिली ब्लड बँक- रक्त पेढी अमेरिकेमध्ये सन १९३७ साली उघडली गेली. आजच्या काळात जगातील जास्तीत जास्त ब्लड बँका रेडक्रॉस आणि त्यांच्या सहयोगी संस्था राबवत आहेत. रेडक्रॉस संस्थेने राबवलेल्या जनजागृती मोहिमेमुळे हजारो लोक थॅलेसेमिया, कर्करोग, रक्ताल्पता-एनिमिया यासारख्या आजारांपासून वाचत आहेत. रेडक्रॉस संघाच्या रूग्णसेवा कार्यालयात सन १९५१ साली समाजसे-वा विभाग समाविष्ट करण्यात आला. हा विभाग माहिती विषयक सेवा पुरवितो. रेडक्रॉसच्या शिष्यवृत्तीसाठी उमेदवार निवडतो व सल्ला देतो. तसेच रेडक्रॉस रूग्णसेवा शाळा, रूग्णपरिचारिकांचे मदतनीस व गृहरूग्णसेवा शिक्षक यांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन करतो. संघाच्या प्रादेशिक परिषदांमुळे राष्ट्रीय संस्थांना विविध देशांसमोर येणाऱ्या सामाईक अडीअडचणींच्या माहितीची देवाणघेवाण करता येते. जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय निर्वासित संघटना, अन्न व कृषि संघटना, युनेस्को इत्यादींची उद्दिष्टे व रेडक्रॉसची उद्दीष्टे यांत बऱ्याच बाबतींत सारखेपणा असल्याने संघ त्यांच्याशी संपर्क ठेवून असतो व त्यांच्याशी सहकार्यही करतो. संघाचे वेगळे कनिष्ठ रेडक्रॉस कार्यालय असून त्याच्यातर्फे कनिष्ठ विभागांना साहाय्य देण्यात येते. राष्ट्रीय रेडक्रॉस संस्थांमार्फत ७५ पेक्षा अधिक देशांमध्ये मुख्यत्वे प्राथमि क व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे कनिष्ठ विभाग संघटित करण्यात आलेले आहेत. विविध वंशांच्या भिन्न संस्कृतींत वाढणाऱ्या मुलांमधील मैत्री व परस्परांविषयीची जाणीव वाढविणे, हेच या विभागांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

!! विश्व रेडक्रॉस दिनाच्या सर्वांना प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा !!

**-कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
गडचिरोली.
मो.७७७५०४१०८६

# सुट्टीचा सदुपयोग करा, नवं काही शिका



एप्रिल, मे आणि जून महिने म्हणजे आपल्याकडे शाळांना सुट्टीचा काळ असतो. दहावी-बारावीच्या परीक्षा झालेल्या असतात. साधारण एप्रिलच्या म ध्यावर सुट्ट्या लागतात. परीक्षेला कंटाळलेली मुले सुट्टीची अगदी अतुरतेने प्रतीक्षा करीत असतात. काहींचे प्लॅन ठरलेले असतात. कुणाला गावाला जायचं असतं, कुणाला फिरायला जायचं असतं. तर कुणाला काही नवं शिकायचं असतं. काहींना नवं काही वाचायचं असतं. एकूण काय तर सुट्टी एंजॉय करायची असते. कुणाला ती सत्कारणी लावायची असते. सुट्टीचा कालावधी आहे, मौजमजा करायला हरकत नाही. पण संपूर्ण सुट्टी अशीच वाया घालवून चालायचं नाही. आपल्याला सुट्टी असली तरी आपण विद्यार्थी आहोत. निरंतर शिकायचं असतं. आपल्याला आवडतं, भावतं, ते शिकायला घ्यायचं! शिकलेलं काही वाया जात नाही. पण काहींना शिकणं म्हणजे पाठ्यपुस्तक वाचणे, अभ्यास करणे असे वाटत राहते. त्यामुळेच आजकालच्या पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा शिकण्याचा कल पाहिला तर तो केवळ शैक्षणिक कालावधीपुरताच दिसून येतो. एकदा का परीक्षा आटोपल्या की मग ही सुट्टी केवळ अन् केवळ या विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईल आणि कंप्युटरवरचे गेम खेळण्यात व्यतित झालेली दिसून येते.काहींच्या हातात बॅट-बॉल येतो. काहीजण कॅरम खेळतात. त्यातल्या त्यात बैठे खेळांना पहिली पसंदी दिली जाते. अर्थात काही शिकण्यासारखं आहे. नवे खेळ, नवे उद्योग शिकायलाच हवेत. जुने खेळ, क्रीडा प्रकार आता दिसेनासे झाले आहेत. खरे तर मोठ्या लोकांनी अशा खेळ प्रकारांना पाठबळ द्यायला हवं. क्रिएटीव्ही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे.

मुलांबरोबर पालकांनीदेखील सुट्टीचे नियोजन करायला हवे. आपल्या पाल्याला मदत करावी. अगोदरच पालक मुलांना तुला अमूक करायचे आहे, तमूक करायचे आहे, असे सांगून आपल्या पाल्यांना दडपणाखाली आणलेले असते. अगोदरच पालकांनी बजावून सांगितलेले असते परीक्षा झाल्याखेरीज मोबाईलला हात लावायचा नाही. त्यामुळे कधी एकदा परीक्षा संपतात आणि कधी एकदा मोबाईलवर गेम खेळतो असे होऊन बसलेले असते. हा मोबाईल केवळ काही मिनिटे पालकांच्या हातात नसतो तर तासन् तास ही मुले पालकांचे मोबाईल आपल्या ताब्यात घेऊन बसतात. यामुळे संपूर्ण वेळ, दिवस त्यातच सरून जातो. याचा परिणाम या मुलांच्या डोळयांवर तर होतोच पण त्यांचा मेंदू ही यातच गुरफटून गेल्याने या मुलांचे लक्ष कुणाच्या बोलण्याकडे जात नाही. एकीकडे मोबाईल, एकीकडे टीव्हीवरील कार्यक्रम, कार्टून्स किंवा कंप्युटरवर ही मुलं तासनतास खिळून बसलेली असतात. अशा मुलांना ना भुकेचा अंदाज येत ना त्यांना तहान लागत. मग यातूनच सुरू होतात, शारीरिकपिडा!

पालक आज आपल्या मुलांचे लाड काही कमी करत नाहीत. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे,म्हणून महागड्या शाळेत पैसे, देणग्या देऊन प्रवेश मिळव-तात. लोकांकडे पैसा असल्याखेरीज ही मंडळी आपल्या मुलांना इंग्रजी शाळांमध्ये घालत नाहीत. शिवाय मुलांना काय हवं, ते त्यांचे शब्द खाली पडण्याअगोदरच कुणी तरी ते उचललेले असतात. आता स्वस्तात मिळणाऱ्या स्मार्ट फोनला अगदी गरिबातला गरीब लोकांना देखील पहिली पंसदी आहे. अगदी पहिलीपासूनच नव्हे तर तीन-चार वर्षाच्या मुलांच्या हातातही मोबाईल हे खेळणं म्हणून असतं. पहिलीपासूनचा अभ्यास हा जरी मुलांच्या शिकण्याचा पाया असला तरी मोबाईलवरील गेम्स, व्हीडिओ, गाणी, आदींच्या सान्निध्यात राहिल्याने मुलांच्या शैक्षणिक जीवनावर त्याचा निश्चितच परिणाम जाणवतो. जाहिरातबाजीचाही या मुलांवर परिणाम झालेला दिसून येतो. ऑनलाईन खरेदी करणे, मोबाईलमध्ये गुंतणे या मुलांना जडलेल्या सवयींकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

शैक्षणिकदृष्ट्या पाल्य आणि पालक, विद्यार्थी आणि शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थी असं या मुलांचं नातं घट्ट होत असताना मोबाईलच्या माध्यमातून हे विद्यार्थी दुसरीकडेच भरटकलेले दिसून येतात. सुट्टीमध्ये पालकांसोबत वेळ घालवताना ही मुलं आपल्या कुटुंबामध्ये फार कमी वेळ रमतात. जितकी ती या निर्जीव उपकरणामंध्ये रमतात. याचे परिणाम मुलांच्या स्वभावावर दिसून येतात. मग अबोल राहणं, कुणामध्ये न मिसळणं, वेळेवर जेवण न जेवणं, एकलकोंडेपणा निर्माण होणं, स्वभावात चिडचिडेपणा येणं. आदी गोष्टी या मुलांच्या जीवना-वर परिणाम तर करतातच पण शैक्षणिक पातळीवर ही या मुलांच्या श्रेणीवर त्याचा परिणाम होतो. ही सुट्टी जरी मुलांना एंजॉय करायची असेल तर काहीवेळा मामाचं गाव, कुटुंबासमवेत सहली, गावी जाणे किंवा घरातच थांबणे आदी पर्याय निवडले जातात.पण फक्त सुट्टी वाया घालवण्यापेक्षा त्याचा सदुपयोग झाला पाहिजे.

आजकाल मुलांचं लक्ष्य मात्र एकच असतं ते म्हणजे मोबाईल, कंम्प्युटर, टीव्ही. प्रवासातही या मुलांच्या हातात मोबाईलच असतो. गेम, व्हीडिओ, गाणी ऐकणे आदी गोष्टींना ही मुलं अधिक प्राधान्य देतात. यामुळे जेव्हा शाळा सुरू होतात तेव्हा मग अचानक अभ्यास हाती घेणे, अभ्यासात मन रमवणे, ट्युशन्स आदी गोष्टी या मुलांना नंतर जड जातात कारण आज वास्तव स्थिती पाहिली तर, मोबाईलचं तंत्र या मुलांच्या मेंदूवर एवढं फिट्ट बसलंय की, या मुलांना जडलेली ही सवय सुटू शकेल की नाही, हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. कारण आजची मुलं ही ख-या अर्थाने आपलं बालपण विसरत चाल-ली आहेत. साहजिकच सुट्टीत मोबाईल व टीव्हीची डीटॅचमेंट देणारे उपक्रम महत्त्वाचे ठरणार आहेत. सुटीभर मुलांनी मोबाईल आणि टीव्ही स्क्रीनमुक्त राहावे, यासाठी पालकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. एकतर मुले टीव्ही व मोबाईलमध्ये गुंतून पडतात. शाळा व अभ्यास नसल्याने पालकांना देखील मुलांना काय सांगावे, असा प्रश्न पडतो. तसेच मुले स्वतः तर टीव्ही व मोबाईलमध्ये गुंतून पडतात. पालक त्यांच्या आवडीचे कार्यक्रम पाहत असतील तर ते देखील मुले पाहतात. शाळा नसल्याने पालक त्यांना टाळून टीव्ही पाहू शकत नाहीत. म्हणजे उन्हाळी सुटीत या मुलांचा स्क्रीन टाइम वाढतो आहे. मुलांना उत्तम प्रकारची उन्हाळी सुटी घालवण्यासाठी छंद वर्ग, शिबिरे, खेळ प्रशिक्षणे, कला वर्गांची गरज आहे. यामध्ये मुलांनी आवर्जून सहभागी व्हायला पाहिजे. अलीकडे स्वच्छंदी बागडण्याचे, निसर्गाचा आस्वाद घेण्याचे, सट्टीचा खरा अर्थ जाणण्याचेच विसरून गेली आहेत. त्यामुळे शरीराला व्यायाम देणारे, मन स्वच्छंदी करणारे, मैत्रीचा बंध जपणारे खेळही आज लोप पावत चालल्याचेच दिसून येतात. चित्रकला, रांगोळी, एमएससी- आयटी संगणक शिक्षण, एकादी भाषा शिकणे, मोडीलिपीसारख्या लिपीची ओळख करून घेणे, चांगली पुस्तके वाचणे, किराणा दुकानात काम करून तिथली परिस्थिती तो व्यवसाय जाणून घेणे अशा बऱ्याच गोष्टी करता येतात. तबला-पेटीचे शिक्षण, कागदकाम, पोहायला शिकणे, सायकल शिकणे, मेहंदी काढणे अशा किती तरी गोष्टी आहेत. त्याच्या शिकण्याने आपल्या ज्ञानात भर पडते. कौशल्य आत्मसात होते. त्याचा उपयोग आपल्याला आयुष्यात वारंवार करता येतो. ज्याला अधिक कला माहित आहेत, अभ्यास आहे,कौशल्य आहे अशा लोकांना खरे तर मोठा मान असतो. त्यामुळे विद्यार्थी या नात्याने आपण रोज काही ना काही शिकले पाहिजे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली
मो. ७०३८१२१०१२

# भारताचे चोख प्रत्युत्तर...

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांनी केलेला हा भ्याड हल्ला पर्यटकांवर नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर होता त्यामुळे भारत पाकिस्तानच्या या भ्याड हल्लयास कधी चोख प्रत्युत्तर देणार ? असा प्रश्न विचारला जात होता. याचे उत्तर बुध-वारी मिळाले.

बुधवार, दि. ७ मे रोजी मध्यरात्री १ वाजून २८ मिनिटांनी भारतीय वायू दलाने पाकव्याप्त काश्मीरवर हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत. भारताने केलेल्या या हल्ल्यात किती दहशतवादी ठार झाले याचा आकडा समोर आला नसला तरी या हल्ल्यात १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची शक्यता असून, यात लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मदचे अनेक मोठे दहशतवादी ठार झाले आहेत.

भारतीय हवाई दलाने जवळपास २३ मिनिटे हल्ले केले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्याला ऑपरेशन सिन्दुर असे नाव देण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात ज्या भारतीय महिलांचे कुंकू (सिन्दुर) पुसले गेले त्या महिलांच्या सन्मानार्थ या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन सिन्दुर असे नाव दिले. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे.

पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून, १५० कोटी भारतीय जनता भारतीय सैन्य दलापुढे नतमस्तक आहे. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहील त्याला भारत घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने जगाला दिला आहे. भारताच्या सार्वभौम-त्त्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ॲक्शनला रिॲक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे हे भारताने पाकिस्तानला



पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्य दलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतर देखील पाकिस्तानची खोड मोडली नाही. पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले. त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी, नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. १९७१ साली भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले. जर पाकिस्तानने आपली खोड मोडली नाही तर भविष्यात पाकिस्तानचे चार तुकडे होतील. भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेल्या या हवाई हल्ल्याला पाकिस्तान कसे उत्तर देईल हे पाहावे लागेल. अर्थात या हवाई हल्ल्याला पाकिस्तानने प्रत्युत्तर दिले तर ती पाकिस्तानची सर्वात मोठी चूक ठरेल. जर पाकिस्तानने तसे केले तर भारत-पाकिस्तान युद्धाला तोंडच फुटेल. भारत-पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो याचे भान पाकिस्तानने ठेवावे.

पाकिस्तानने चीनच्या भरवश्यावर भारताशी दोन हात करू नयेत. कारण आजचा भारत हा चीन-लाही जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. चीननेही पाकिस्तानची बाजू लावून धरू नये. कारण दहशत-वादाविरुद्धच्या या युद्धात भारताला अनेक देशांची साथ आहे. अमेरिका, इस्राईल, जपान, रशिया या देशांनी आताच भारताला पूर्ण पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला जरी तुर्कस्तान, मलेशिया आणि काही इस्लामिक राष्ट्रांनी पाठिंबा दिला असला तरी जगा-तील सर्व प्रमुख देश भारताच्या बाजूने आहेत हे पाकिस्तानने विसरू नये. पाकिस्तानने जर पुन्हा भारताची कुरापत काढली तर त्याची शिक्षा पाकिस्तानला मिळेलच यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्य दलाला सॅल्युट! जयहिंद !!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात दि. १६ मे च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १६ मे २०२५ रोजी म ध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रांना हा आदेश लागू राहणार नाही.

### संचिता पवार हिला बारावी परीक्षेत ९४.६७ टक्के



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील व्ही.एच.जे. जुनियर विद्यालयाची विद्यार्थिनी संचिता सुनील पवार निवघेकर हिने बारावी वाणिज्य शाखेत ९४.६७% गुण मिळवत मोठे यश संपादन केले आहे. पाथवे कॉमर्स अँड मॅनेजमेंट हबच्या संचालिका डॉ. अनुजा मुधोळकर, चार्टर्ड अकाउंटंट अनिरुद्ध तोष्णिवाल, चिराग जैन, अक्षय शर्मा, एडवोकेट रोहन राठोड आदींचे तिला मार्गदर्शन लाभले. तिने यशाचे श्रेय विश्वनाथ आप्पा हुरणे कॉलेज व क्लासेस, आजी, आजोबा व आई, वडिलांना दिले आहे.

# आजीसारख्या संस्था जपणे काळाची गरज –देविदास फुलारी

## दायी जळूबाईंच्या पुतळ्याचे अनावरण व 'अनलिमिटेड आजी' या पुस्तकाचे प्रकाशन




**नांदेड (प्रतिनिधी)–** माणसे अधिकाधिक स्वमग्न होत असल्याच्या या काळात आपले घर, कुटुंब, नाती सुरक्षित ठेवल्याशिवाय माणसाला सुखी राहता येत नाही. हे जेवढे सत्य आहे तेवढेच सामाजिक बांधिलकी जोपासल्याशिवायही माणूस समाधानी राहू शकत नाही. त्यामुळे आई, आजीसारख्या मूल्य पेरणाऱ्या संस्था सांभाळणे गरजेचे आहे, असे मत साहित्यिक देविदास फुलारी यांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागात प्रसुतीशास्त्रात दायी म्हणून अतुलनीय योगदान दिलेल्या दायी स्मृतिशेष जळूबाई वाघमोडे नंदूरकर यांचा पुतळा अनावरण व 'अनलिमिटेड आजी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नंदूर (ता.देगलूर) येथे थाटात संपन्न झाला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी माधवराव पाटील शेळगावकर तर प्रमुख वक्ते म्हणून देविदास फुलारी, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, कवी महेश मोरे, आबासाहेब कल्याणकर मंचावर उपस्थित होते.

यावेळी सामाजिक योगदान दिलेल्या संस्कृती संवर्धन मंडळाचे प्रमोद देशमुख, चित्तांगराव कदम, मूर्तिकार व्यंकट पाटील यांचा संयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक जेष्ठ पत्रकार एन. जी.वाघमोडे यांनी केले. यावेळी कुलदीप नंदूरकर यांच्या 'अनलिमिटेड आजी' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना देविदास फुलारी म्हणाले की, जळूबाई नावाच्या ५०० बाळंतपण करणाऱ्या आजीचे अनुभव व पुस्तकात आलेल्या ग्रामीण म्हणी या स्वतंत्रपणे कादंबरीचा विषय आहे. त्यामुळे हे मूल्य पेरणारे ग्रामीण शब्द आपण सगळ्यांनी जपले पाहिजे असा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी आबासाहेब कल्याणकर, प्रमोद देशमुख, चित्तांगराव कदम यांची समयोचित भाषणे झाली. माधवराव पाटील शेळगावकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. सदरील कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन पत्रकार राम तरटे यांनी केले.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्जुन पाटील कंदगुळे, विष्णुकांत खांडेकर, प्रशिक नंदूरकर, शंकरअप्पा येळगीकर, नाथ महाराज नंदूरकर, यादूगोंडा कोळनुरे, सुगत नंदूरकर, रंगराव कोळनुरे आदींनी परिश्रम घेतले.

# कृषी सहायकांचे नांदेड तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेने ५ मे पासून आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यस्तरीय आंदोलन पुकारले आहे. त्यामध्ये ५ मे रोजी काळ्या फिती लावून कामकाज करणे. ६ मे रोजी सर्व शासकीय व्हाट्सअप ग्रुप मधून बाहेर पडणे. ७ मे रोजी आंदोलनाचा तिसरा टप्पा म्हणून तालुका कृषी अधिकारी नांदेड कार्यालयासमोर कृषी सहायकांनी धरणे आंदोलन केले.

कृषी सहायकांचे पदनाम बदलून सहायक कृषी अधिकारी करणे, कृषी सहायकांना कामकाजासाठी लॅपटॉप मिळावा, कृषी सेवक कालावधी रद्द करण्यात यावा व इतर मागण्यांसाठी धन्य आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष वसंत जारिकोटे, नांदेड जिल्हाध्यक्ष शंकर पवार, नांदेड तालुकाध्यक्ष बाळासाहेब बारसे यांनी आंदोलनाविषयी माहिती दिली. तसेच राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे ना. रा. जाधव यांनी आंदोलन काळामध्ये राबवायच्या विविध बाबीं विषयी माहिती दिली.

याप्रसंगी तालुका सचिव दत्ता भुते, तालुका कार्याध्यक्ष बालाजी होनवडजकर, तालुका उपाध्यक्ष वनिता सर्वज्ञ, दिपाली मोरे, अर्चना काष्टेवाड, सलमा पाळेकर, अश्विनी वासलवार, विजयकुमार पाटील, शिवराज वसमते, संभाजी वाघमारे, रोहिणी मुधोळकर, अर्चना राठोड, सविता जारीकोटे, वर्षा कोळगिरे, गंगासागर क्षीरसागर, माधुरी राजूरकर, रेखा येरेकर वनमाला मोरताडे, उज्वला मगर, मोरे ए. एस. आदींनी सहभाग नोंदवला. तसेच ८ मे रोजी सर्व कृषी सहाय्यक एक दिवसीय सामूहिक रजेवर जाणार आहेत. ९ मे रोजी सर्व शासकीय ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकणार असून यानंतरही शासनाने मागण्याची दखल नाही घेतल्यास १५ मे पासून संपूर्ण कामकाजावर बहिष्कार टाकणार आहेत.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा

## खा. रवींद्र चव्हाण यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यातील वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे केली आहे.

या निवेदनात खासदार रवींद्र चव्हाण यांनी नमूद केले की, गेल्या काही दिवसापासून नांदेड जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वारे व अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. उन्हाळी शेती पिके, केळी,आंबा व इतर फळबागा या नैसर्गिक आपत्तीत भुईसपाट झाल्या आहेत. शहरी तसेच ग्रामीण भागात नुकसानीचे प्रमाण प्रचंड दिसून येत आहे. गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांच्या घरावरील पत्रे उडून गेली, घरांचेही प्रचंड नुकसान झाले. शिवाय विजा कोसळून शेतकऱ्यांची जनावरे दगावली. वारंवार होणाऱ्या अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी पार खचून गेला असून शेतकऱ्याला तातडीच्या आर्थिक मदतीची गरज आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे प्रशासकीय पातळीवर तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत व नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी खासदार रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

# रोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेबद्दल पोलीस अधीक्षकांचे अभिनंदन



**नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मिशन उडाण अभियानाअंतर्गत भव्य रोजगार मेळावा घेऊन यशस्वीरित्या पार पाडला. तसेच हजारो युवक / युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत सामाजिक दायित्व निभावले. या विशेष कार्याबद्दल पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी बाळासाहेब सातोरे यांनी शाल–पुष्पगुच्छ तसेच रतन टाटा यांचे आत्मचरित्र पुस्तक भेट दिले. याप्रसंगी स्थानिक गुन्हे शाखेचे उदय खंडेराय, भदंत पंय्याबोधी म हाथेरो, सोमभारती महाराज, बंटी कुंटूरकर, सचिन माने आदींची उपस्थिती होती.

# आ.संजय केणेकर यांच्या हस्ते गंगाधर सोनटक्के यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान



**अ धा र्‍ पू र (प्रतिनिधी) –** समग्र सोशल फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर संस्थेच्या वतीने पत्रकार गंगाधर सोनटक्के यांना राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आ. संजय केणेकर तर कार्यक्रमाचे अध्यक्ष एस. पी. जवळकर, श्री.श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी शनिभक्त सुखदेव महाराज, महंत स्वामी भरतगिरी महाराज, ह.भ. प. मयुरी संजय डोबळे, सौ. मनिषा भन्साळी, भाजप शहर उपाध्यक्ष छ. संभाजीनगरचे अध्यक्ष संतोष सुरडकर यांच्या प्रमुख उपस्थिती होती.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह सन्मित्र कॉलनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात पत्रकार गंगाधर सोनटक्के यांना राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवसेना विधानसभा संघटक देवानंद शिंदे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

# बारावी परीक्षेत 'एसव्हीएम 'च्या यशाची परंपरा यंदाही कायम

**किनवट (प्रतिनिधी)–** प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही येथील सरस्वती विद्या मंदिर कनिष्ठ विद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८ टक्के लागला. कला शाखेचा ७७ टक्के, तर व्यवसायीक अभ्यासक्रमाचाही ७७ टक्केच निकाल लागला.

विज्ञान शाखेतून कु. सुरभी गोविंद शिंदे हिने ८४.१७ टक्के गुण घेत महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान पटकावला. कु. सानिका विजय पत्तेवार हिने ८१.५० टक्के, कु. शिवरात्री रमेश राठोड ८१.३३ टक्के, कला शाखेतून स्वप्नील गजानन भवरे याने ७७.३३ टक्के, कु.अनु अनिल काटकर ७६.५० टक्के, कु. प्राची विनोद शेटपेल्लीवार ७३.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे . व्यावसायिक अभ्यासक्रमात सोनुताई दिलीप ढोगंडे, प्रतीक बळीराम राठोड, गणेश मदन चौफाडे यांनीअनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येण्याचा मान पटकावला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, सचिव तथा मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार, रेणुकादास पहुरकर तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

# हदगाव येथे वासवी माता जयंती साजरी




**हदगाव (प्रतिनिधी)–** येथील आर्य वैश्य समाजाच्या वतीने आर्य वैश्य समाजाचे आराध्य दैवत कुलस्वामिनी माता वासवी देवीची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वासवी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरती करण्यात आली.

यावेळी वासवी मातेच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारे अनेकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नांदेड येथील वासवी माता मंदिर उभारणीस देणगी दिलेले आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास दमकोंडवार यांचा सपत्नीक सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे सदस्य शिरीष मनाठकर, जिल्हाध्यक्ष प्रभाकर पत्तेवार मुख्य सलागार डॉ. संजय पलीकोंडावार, प्रसिद्धीप्रमुख सुनील व्यवहारे, महिला महासभेच्या दिपा गंधेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या कार्यकारणीत दुसऱ्यांना प्रतिनिधित्व दिल्याबद्दल राजेश्वर रायेवार यांचा सत्कार डॉ. पि. टी. मुक्कामावर, विलास व्यवहारे, डॉ. गोकुळ चक्करवार, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी वासवी मातेच्या प्रतिमेचा फोटो फ्रेम आर्य वैश्य समाजाच्या वतीने वाटप करण्यात आल्या.

जिल्हाध्यक्ष प्रभाकर पत्तेवार यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्तावना केली. डॉ. संजय पलीकोंडावार यांनी मनोगत मांडले.

या कार्यक्रमास आर्य वैश्य समाज बांधव महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. अल्पपोहारानंतर कार्यक्रमात सांगता करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यसाठी अनिल प्रतापवार, मनोज करचलवार, डॉ. मामीडवार, सुरेश तुप्तेवार, गजानन रेवणवार, सुर्यकांत मुक्कावार, विजय व्यवहारे, प्रशांत मुक्कावार आदींनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला समाज बांधव व भगिनी तसेच वासवी क्लबचे सदस्य, आर्य वैश्य महासभेचे पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावल्याबद्दल अध्यक्ष श्रीनिवास दमकोंडवार यांनी सर्वांचे आभार मानले. पुढील वर्षीची वासवी मातेची जयंती आपल्या नवीन आर्य वैश्य मंगल कार्यालय करू असा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# 'वसंत' व्याख्यानमालेत उद्या डॉ. मार्तंड कुलकर्णी यांचे व्याख्यान

**किनवट (प्रतिनिधी)–** संत साहित्याचे अभ्यासक तथा वक्ते प्रोफेसर डॉ. मार्तंड कुलकर्णी यांना मिरज विद्यार्थी संघांद्वारे चालविल्या जाणाऱ्या ख्यातनाम अशा वसंत व्याख्यानमालेचे निमंत्रण आले. या व्याख्यानमालेत डॉ. कुलकर्णी हे शंभरावे पुष्प गुंफणार आहेत.

मिरज येथे दि.९ मे रोजी पार पडणाऱ्या वसंत व्याख्यानमालेत डॉ .मार्तंड कुलकर्णी हे मातृभक्ती संप्रदाय व संत कवी विष्णुदास या विषयावर विचार मांडणार आहेत. प्रतिभासंपन्न कवी मिरजभूषण वासुदेव शास्त्री खरे यांची प्रेरकस्मृती खरे मंदिर या वास्तूच्या रूपाने लाभलेल्या मिरज विद्यार्थी संघांद्वारे १९२५ पासून ही व्याख्यानमाला चालविली जाते. यापूर्वी डॉ. कुलकर्णी यांनी नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या चक्रधर स्वामी अध्यासन केंद्राद्वारे आयोजित व्याख्यानमाला तसेच अकोला येथील प्रसिद्ध अशा कस्तुरी परिवाराच्या व्याख्यानमालेत आपल्या विचारांची मांडणी केली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तसेच मराठवाडा साहित्य संमेलनात अनेक वेळा परिसंवादात त्यांनी आपली मते मांडली आहेत. अनेक ठिकाणी आपल्या मांडणीतून संत साहित्याबरोबरच विद्यमान विषयावर ते सातत्याने मत मांडत असतात.

# जिल्हा परिषदेमधील सार्वत्रिक बदली प्रक्रियेत शिपाई व वाहन चालकांची सुद्धा बदली करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदमधील सर्व संवर्गातील वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या बदलीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. ६ मेपासून समुपदेशनाद्वारे बदली प्रक्रियेला सुरुवात झाली असून ९ मे रोजी बदल्यांच्या प्रक्रियेचा समारोप होणार आहे. या प्रक्रियेत दुर्गम भागात सेवा बजावणाऱ्या शिपाई व वाहन चालक पदांचाही समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दि. ८ मेपासून जिल्हा परिषदेत बदल्यांची प्रक्रिया सुरु आहे. तशी प्रशासनाची तशी तयारी सुद्धा झालेली आहे. परंतु जिल्हा परिषदमधील शिपाई व वाहनचालक यांची सुद्धा बदली याच बदली प्रक्रियेत करणे आवश्यक असताना व शासन परिपत्रकात तसे नमूद असताना मागील दहा ते बारा वर्षांपासून या सवर्गाच्या बदली करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे किनवट व माहूर सारख्या दुर्गम भागात तसेच दूरवर खेडोपाडी कार्यरत असलेले अनेक शिपाई व वाहनचालक यांच्यावर अन्याय होत आहे. त्यांना प्रचंड घरगुती अडचणीचा सामना करावा लागत आहे.

या संदर्भात जिल्हा परिषद कर्मचारी युनियन तर्फे मागील दोन ते तीन वर्षापासून सतत ही मागणी करण्यात येत होती. ५ मे रोजी जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) राजकुमार मुक्कावार यांची जिल्हा परिषद कर्मचारी युनियन (ओंकार) संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. होऊ घातलेल्या बदली प्रक्रियेमध्ये शिपाई व वाहन चालकांची सुद्धा समुपदेशनाद्वारे बदली करण्यात यावी तसेच वर्ग ३ कर्मचाऱ्यांचे आपसी बदली सुद्धा करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

शिष्टमंडळामध्ये कर्मचारी युनियनचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव पुजरवाड, जिल्हा अध्यक्ष धनंजय गुम्मलवार, सचिव राघवेंद्र मदनूरकर, कोषाध्यक्ष सचिन चौदंते, पवन तलवारे, संतोष मठपती, विभागीय संघटक सौ. छाया कांबळे, जिल्हा संघटक रंजीत गजभारे, शेख मुक्रम, बालाजी महाजन, लक्ष्मीकांत मोटरवार, राजेश जोंधळे, दीपक महालिंगे, महेश लोणीकर, जितेंद्र तोटलवार यांच्यासह कर्मचारी युनियनचे सदस्य उपस्थित होते.

# ड्रेनेज पाईप लाईनच्या कामाचा आ.बोंढारकर यांच्या हस्ते शुभारंभ

## जिंदमनगर, कंथकनगर, चेतकनगर, विठ्ठलराजनगरच्या नागरिकांची होणार सोय



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** शासनाच्या अमृत दोन योजनेअंतर्गत नांदेड शहरातील महापालिका अंतर्गत २९ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केलेला आहे. त्या अंतर्गत जिंदमनगर, कंथक नगर, चेतकनगर, विठ्ठलराजनगर आदी भागात एसटीपी उभारून पाईप लाईन टाकण्याच्या कामाचा नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते दि. ७ मे रोजी शुभारंभ करून कामास सुरुवात करण्यात आली.

सदर योजनेमध्ये कंथक नगर, चेतक नगर जिंदमनगर येथील ट्रेनिंग लाईन व एसटीपी बसवण्याचे काम अंदाजे दीड कोटी रुपये एवढ्या किमतीचे काम प्रस्तावित आहे. कंथकनगरसह जिंदनगर गोपाळचावडी आदी भागातील नागरीकांचे सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. ड्रेनेज लाईनचे काम करताना जागेचा उतार लक्षात घेता ग्रामपंचायतीच्या जागेतून नवीन ड्रेनेज पाईप लाईन टाकून एमआयडीसी लगत असलेल्या नाल्याच्या शेजारी डिस्ट्रिक्ट उभारण्याचे काम करण्यात येत आहे. त्यानंतर ग्रामपंचायत भागात सुद्धा सदर ट्रेनिंग लाईनचे काम होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत भाग तसेच कंथकनगर भागातील लोकांच्या ड्रेनेज लाईनचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. जिंदमनगर, कंथकनगर, चेतकनगर, विठ्ठलराजनगरला जोडणाऱ्या मलशुद्धीकरण केंद्राचे अमृत २.० योजनेत मुंजूर पाईप लाईनच्या कामाचा आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला.

या कामास गोपाळचावडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच साहेबराव पाटील सेलूकर यांनी पुढाकार घेऊन ड्रेनेज पाईप लाईनचा मार्ग मोकळा करून दिला.

यावेळी शिवसेनेचे महानगर अध्यक्ष तुलजेश यादव, शिवसेना ओबीसी व्हिजे एनटी जिल्हाप्रमुख अनिल धमने, सदाशिव कदम, श्याम जाधव, सरपंच प्रतिनीधी प्रदीप लाखे, आशीर्वाद डाकोरे, यशवंत आवळे, साहेबराव जोंधळे, शाकीर शेख, अशोक बनसोडे, मनोज नांदेडकर, अजय खटके, फेरोज शेख, त्रिशला कांबळे, बाळू सोळंके यांच्यासह महिला व पुरुषांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

# केस वाढवण्यापासून ते केस गळतीरोखण्यापर्यंत, ७ तेल देतात ७ फायदे!



**आपले केस कोरडे आणि निर्जीव होऊ लागताच आपण तेल लावायला सुरुवात करतो. काही लोक नारळाचे तेल वापरतात, काही मोहरी किंवा बदामाचे तेल वापरतात. पोषणतज्ञ श्वेता शाह हिने तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट करून केसांशी संबंधित कोणत्या समस्येवर कोणते तेल प्रभावी मदत करते हे सांगितले आहे. जर तुमच्या केसांची वाढ मंदावली असेल किंवा केस गळणे थांबत नसेल, तर यासाठी कोणते केसांचे तेल वापरावे, हे आम्ही तुम्हाला सविस्तरपणे सांगतो...**

- बदाम आणि तीळ तेल : आपल्यापैकी अनेकांना हे माहित नाही की केसांशी संबंधित प्रत्येक समस्येसाठी वेगवेगळे तेल वापरले जाते. उदाहरणार्थ, जर तुम्हाला तुमचे केस पौष्टिक आणि रेशमी बनवायचे असतील, तर व्हिटॅमिन ई समृद्ध बदाम तेल वापरा. दुसरीकडे, जर तुम्हाला तेलाने टाळूमध्ये खोलवर पोहोचून स्प्लिट एंड्स दुरुस्त करायचे असतील, तर तुम्ही तीळ तेल वापरावे.
- कांदा आणि भृंगराज तेल : तुमच्यापैकी बरेच जण कांद्याच्या तेलाने तुमच्या टाळूची मालिश करत असतील. आम्ही तुम्हाला सांगतो की कांद्याचे तेल टाळूवर लावल्याने रक्ताभिसरण वाढते आणि केस गळणे कमी होते. तसेच, जर तुम्ही तुमच्या केसांवर भृंगराज तेल वापरले तर ते तुमच्या केसांच्या कूपांना सक्रिय करते आणि केसांच्या वाढीस चालना देते. म्हणून, तुमच्या केसांच्या समस्येनुसार केसांचे तेल निवडा.
- एरंडेल आणि आर्गन तेल : एरंडेल तेलात रिसिनोलिक ॲसिड असते, जे केसांना जाड बनवण्याचे काम करते. केसांवर ते वापरल्याने केसांमधील ओलावा टिकून राहतो आणि कोरडेपणा आणि कुरकुरीतपणा देखील दूर होतो. म्हणून, केसांना तेल लावण्यासाठी तेलाची निवड काळजीपूर्वक करा.
- कडुलिंबाचे तेल : केसांवर कडुलिंबाचे तेल खूप कमी लोक वापरतात, परंतु



तुम्हाला त्याचे फायदे माहित असले पाहिजेत. श्वेता शाह यांनी सांगितले की, कडुलिंबाच्या तेलात अँटीफंगल गुणधर्म असतात, ज्यामुळे ते कोंड्याशी लढण्यास मदत करते. आम्ही तुम्हाला सांगतो की अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांनी समृद्ध असलेले हे तेल टाळूवरील संसर्ग आणि खाज कमी करण्यास देखील मदत करते. वेगवेगळ्या तेलांचे फायदे जाणून घेतल्यानंतर, आता तुम्हाला कोणते तेल कधी वापरायचे हे समजले असेलच.

# चुकीच्या पद्धतीने लूफा वापरल्यास त्वचेला त्रास..!



**जसे आदिम माणसाला स्वच्छतेचे महत्व पटले तेव्हापासून माणूस शरीर स्वच्छ ठेवण्यासाठी विविध गोष्टींचा उपयोग करू लागला. जुन्या काळी लोक शरीर स्वच्छ करण्यासाठी नैसर्गिक गोष्टी वापरत असत. मग नवनवे शोध लागले आणि आता लोक शरीरावरील घाण व त्वचेच्या मृतपेशी साफ करण्यासाठी लूफाचा वापर करू लागले आहेत. बॉडी वॉशसोबत वापरल्याने लूफावर फेस तयार होतो आणि नंतर तो त्वचेला चोळण्याने त्वचा अधिक चांगल्या प्रकारे स्वच्छ करता येते. जर तुम्ही दररोज अंघोळ करताना लूफाचा वापर केला तर तो तुमच्या त्वचेला पॉलिश करतो आणि त्वचा चमकू लागते. लूफा वापरल्यानंतर त्वचा कोरडी होत नाही. पण लूफा वापरण्याचे जसे फायदे आहेत तसेच तोटे देखील आहेत आणि म्हणूनच लूफा योग्यप्रकारे वापरायला हवा नाहीतर त्यामुळे त्वचेला त्रास होऊ शकतो.**

## फायबर आणि प्लॅस्टिकचा लूफा

फायबर आणि प्लॅस्टिकपासून बनवलेल्या मऊ दिसणाऱ्या लूफाने आंघोळ करणे त्वचेसाठी धोकादायक ठरू शकते. जर तुम्ही आंघोळ करताना लूफा वापरत असाल तर काळजी घ्या. कारण जीवाणू ओल्या लूफामध्ये वाढतात. आपण लूफा वापरतो कारण तो शरीरातील साचलेली घाण आणि मृत त्वचा पेशी काढून टाकण्यास मदत करतो. या मृत पेशी लूफामध्ये जमा होतात आणि जर लूफा पूर्णपणे कोरडा झाला नाही, त्यात जंतूंची वाढ होते. जंतू असलेला लूफा वापरल्यास त्वचेला संसर्ग होण्याचा धोका असतो.

## लूफा वापरताना घ्या खबरदारी...



बरेचदा लोक घाईघाईत लूफा वापरल्यानंतर साफ न करता तसाच ठेवून देतात. ज्यामुळे बॅक्टेरिया किंवा फंगल इन्फेक्शनसारख्या समस्या उद्भवू शकतात. लूफा त्वचेच्या मृत पेशी काढून टाकण्याचे काम करतो आणि जेव्हा आपण लूफा वापरतो तेव्हा या पेशी त्वचेतून काढून टाकल्या जातात, परंतु त्या लूफामध्येच राहतात. असा लूफा तुम्ही स्वच्छ न करता आणि न धुता वापरला तर हानीकारण जंतू त्वचेवर जमा होतात आणि त्यामुळे त्वचेशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे प्रत्येक वेळी आंघोळ केल्यानंतर लूफा स्वच्छ धुवा आणि स्वच्छ ठिकाणी ठेवा जिथे तो पूर्णपणे सुकेल. तसेच आठवड्यातून एकदा लूफा धुण्यासाठी अँटीबॅक्टेरियल साबण वापरा.

## लूफाचा वापर कसा करावा?

लूफा वापरताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की लूफा नेहमी ओला करूनच वापरायला हवा. कोरडा असताना लूफा त्वचेवर घासला तर त्वचेवर पुरळ उठू शकते. म्हणून लूफा वापरण्यापूर्वी तो पूर्णपणे ओला करा. यानंतर, त्यावर बॉडीवॉश लावा आणि त्यात फेस तयार करा. जेव्हा लूफाला योग्य प्रकारे फेस येतो, तेव्हा तो आपल्या शरीरावर गोलाकार पद्धतीने घासून घ्या व नंतर आपले हात आणि लूफा स्वच्छ धुवून ठेवा. लूफा ठेवताना अशा ठिकाणी ठेवा जिथे तो पूर्णपणे सुकून कोरडा होईल.

## घर्षणामुळे नुकसान

आंघोळ केल्यावर त्वचा अधिक स्वच्छ आणि सुंदर दिसते, पण लूफाच्या घर्षणामुळे नाजूक त्वचेचे नुकसान होऊ शकते. ज्यांची त्वचा संवेदनशील आहे त्यांनी लूफा वापरू नये अन्यथा आंघोळ केल्यावर तुमची त्वचा सोलवटली जाऊ शकते.

## दर महिन्याला लूफा बदला

लूफा प्लास्टिकचा बनलेला असल्याने त्याचे काही दुष्परिणाम होतात. जर तुम्ही नियमितपणे लूफा वापरत असाल तर तो दर महिन्याला बदला. प्रत्येक वेळी आंघोळ करताना त्याचा वापर केल्यामुळे, त्याचे प्लास्टिक कडक होऊ लागते, ज्यामुळे त्वचेवर ओरखडे येऊ शकतात किंवा त्वचेवर पुरळ किंवा खाज येण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे दर महिन्याला लूफा बदलत राहा. तसेच तुमचा लूफा इतरांना वापरायला देऊ नका.



# फेस पावडर निवडताना...



**फेस पावडर हे मेकअपमधील एक महत्त्वाचं सौंदर्य प्रसाधन आहे. पूर्वी चेहऱ्यावर फक्त पावडर लावण्याची पद्धत होती. मात्र आता मेकअपचे इतके विविध प्रकार उपलब्ध आहेत की, मेकअप सेट करण्यासाठी फक्त फेस पावडरचा वापर केला जातो. फेस पावडर लावण्यामुळे चेहऱ्यावर घाम येत नाहीच, शिवाय चेहऱ्यावरील काळे डाग, व्रण झाकले जातात. एवढंच नाही आजकाल बाजारात विविध प्रकारच्या फेस पावडर मिळतात. यासाठीच जाणून घ्या फेस पावडरचे हे विविध प्रकार...**

- लूज पावडर : लूज पावडर ही एखाद्या डबीत अथवा बॉक्समध्ये मिळते. मेकअप सेट करण्यासाठी ब्रशच्या मदतीने तुम्ही लूज पावडर वापरू शकता. ज्यामुळे तुमचा मेकअप खूप वेळ टिकेल. नॅचरल लुकसाठी लूज पावडर लावणं फायद्याचं आहे. लूज पावडर तुमच्या चेहऱ्यावरील तेल आणि घाम शोषून घेते. ज्यामुळे फ्रेश लुक तुम्हाला मिळू शकतो. तेलकट त्वचेच्या महिलांनी लूज पावडर लावणं जास्त फायद्याचं ठरेल.
- बनाना पावडर : मेकअपची आवड असणाऱ्या महिलांकडे आजकाल बनाना पावडर असतेच. बनाना पावडर ही पिवळसर रंगाची एक अल्ट्रा फाइन, टोंड पावडर आहे. कन्सिलर आणि फाऊंडेशन सेट करण्यासाठी या पावडरचा चांगला फायदा होतो. जर तुमच्या चेहऱ्यावर लालसर डाग अथवा पुरळ असेल तर तुम्ही ते या पावडरमुळे झाकू शकता. डार्क सर्कल्स लपवण्यासाठी बनाना पावडरचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.
- कॉम्पॅक्ट पावडर : बाजारात प्रेस्ड पावडरदेखील सहज मिळतात, ज्यांना आपण कॉम्पॅक्ट असं म्हणतो. स्पंज अथवा ब्रशच्या मदतीने तुम्ही कॉम्पॅक्ट पावडर चेहऱ्यावर लावू शकता. लूज पावडरपेक्षा प्रेस्ड पावडर अधिक पिगमेंटेड असते. कारण यासाठी यामध्ये मेण अथवा सिलिकॉन वापरण्यात येतं. मेकअपमध्ये कॉम्पॅक्टचा वापर केला जातो. मेकअप न करताही तुम्ही फक्त कॉम्पॅक्ट अथवा प्रेस्ड पावडर चेहऱ्यावर लावू शकता.
- मिनरल पावडर : लूज आणि प्रेस्ड अशा दोन्ही स्वरूपात मिळणारी मिनरल पावडर ही पावडरच्या सूक्ष्म कणांपासून बनलेली असते. या पावडरमध्ये सिंथेटिक घटक नसतात. चेहऱ्यावर एक सुरक्षित कवच तयार होतं. तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार तुम्हाला बाजारात मिनरल पावडर विकत मिळतात.
- पावडर फाउंडेशन : तुमची त्वचा तेलकट असेल तर तुम्ही लूज अथवा प्रेस्ड पावडरऐवजी पावडर फाउंडेशन वापरू शकता. कारण यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील तेल निर्मिती जास्त काळ नियंत्रित केली जाते. तेलकट चेहऱ्यावर क्रीम अथवा जेल फाउंडेशन लावण्यापेक्षा हा चांगला पर्याय आहे. शिवाय यामुळे तुमच्या चेहऱ्याला मॅट फिनिश लुक मिळतो.



# स्कीन फास्टिंग म्हणजे काय?

**प्रत्येकीला आपली त्वचा सुंदर आणि चमकदार असावी असं वाटत असतं. त्वचेची निगा राखण्यासाठी आजकाल अनेक गोष्टी केल्या जातात. महागड्या ब्युटी ट्रिटमेंट, काटेकोर डाएट, भरमसाठी ब्युटी प्रॉडक्ट वापरूनही बऱ्याचदा हवा तसा परिणाम दिसून येत नाही. वास्तविक त्वचेची नैसर्गिक पद्धतीने निगा राखणं जास्त फायदेशीर ठरू शकतं. नैसर्गिक पद्धतीने त्वचेची निगा राखण्यासाठी आजकाल स्कीन फास्टिंग केलं जातं. त्यामुळे स्कीन फास्टिंग करणं सध्या ट्रेंडमध्ये आहे...**

ट्रेंडमध्ये असलेलं हे स्कीन फास्टिंग म्हणजे नेमकं काय आहे आणि ते कसं करावं असं तुमच्या मनात नक्कीच सुरू असेल. स्कीन फास्टिंग म्हणजे त्वचेला केमिकलयुक्त प्रॉडक्टपासून दूर ठेवायचं. कारण आजकाल बाजारात मिळणाऱ्या ब्युटी प्रॉडक्ट्समध्ये भरपूर केमिकल्स असतात. ज्यामुळे त्वचेचं नुकसान होऊ शकतं. अचानक स्कीन केअर अथवा मेकअपचे प्रॉडक्ट वापरणं थांबवता येत नसलं तरी, हळूहळू तुम्हाला तुमच्या त्वचेवर असा ब्युटी प्रॉडक्टचा मारा करणं थांबवता येतं. यालाच स्कीन फास्टिंग असं म्हणतात. स्कीन फास्टिंग जमू लागल्यावर तुम्ही नैसर्गिक पद्धतीने अथवा घरगुती उपचार करून तुमच्या त्वचेची निगा राखायची असते. कारण नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले स्कीन केअर अथवा घरगुती उपचार तुमच्या त्वचेची निगा तर राखताच पण त्यामुळे तुमच्या त्वचेच्या समस्यांही कमी होतात.



## स्कीन फास्टिंग कसं करावं?

आपल्याला नेहमी अनेक ब्युटी प्रॉडक्ट वापरण्याची सवय झालेली असते. त्यामुळे ब्युटी प्रॉडक्टशिवाय जगणंही आपण सहन करू शकत नाही. पण जर ते ब्युटी प्रॉडक्ट तुमच्या त्वचेवर दुष्परिणाम करत असतील तर त्यापासून दूर राहणं हाच उत्तम उपाय आहे. यासाठी अचानक ब्युटी प्रॉडक्ट वापरणं सोडू नका. नाहीतर तुमची त्वचा लगेच निस्तेज आणि कोरडी पडेल. हळू हळू ब्युटी प्रॉडक्ट्स वापरणं सोडायचा प्रयत्न करा. या दरम्यान तुम्ही वेगन, केमिकल फ्री, आयुर्वेदिक, क्रुअल्टी फ्री प्रॉडक्ट्स नक्कीच वापरू शकता. त्यानंतर त्वचेची निगा राखण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि नैसर्गिक उपाय करणे सुरू करा.

# हेअर पॅक लावताय?



**आजकाल धुळ, माती, प्रदूषण, स्टायलिंग प्रॉडक्ट यामुळे केसांचे खूप नुकसान होत असते. सहाजिकच केसांची योग्य निगा राखली तरच केस मजबूत आणि मुलायम राहतात. यासाठी फक्त शॅम्पू आणि कंडिशनर करणं पुरेसं नाही. केसांची निगा राखण्यासाठी नियमित हेअर पॅक वापरणंही फायद्याचं ठरू शकतं. कारण हेअर पॅकमधील पोषक घटकांमधून केसांना चांगले पोषण मिळतं. पण यासाठी कोणताही हेअर पॅक थेट केसांसाठी वापरू नका. केसांवर पॅक लावण्यापूर्वी प्रत्येकाला काही बेसिक गोष्टींची माहिती असायला हवी. कारण हेअर पॅक विविध घटकांपासून बनलेले असतात. प्रत्येक घटक तुमच्या केसांवर परिणामकारक ठरेलच असं नाही. हेअर पॅक तुमच्या केसांसाठी योग्य नसेल तर केसांना फायदा होण्याऐवजी केसांचे नुकसानच होऊ शकते. यासाठी केसांवर कोणताही हेअर पॅक लावण्यापूर्वी काही गोष्टी अवश्य तपासून पाहा...**

## हेअर पॅक लावण्यापूर्वी हे जाणून घ्या...


- केसांच्या प्रकारानुसार निवडा हेअर पॅक : जाहिरात पाहून अथवा कोणीतरी सांगितलं म्हणून केसांवर एखादा हेअर पॅक लावू नका. आजकाल बाजारात विविध प्रकारच्या केसांसाठी विविध प्रकारचे हेअर पॅक विकत मिळतात. मात्र हेअर पॅक खरेदी करण्यापूर्वी तुम्हाला तुमच्या केसांचा प्रकार माहीत असायला हवी. तुमचे केस तेलकट, कोरडे, कुरळे, पातळ, जाड कसे आहेत यावरून केसांना कशाची गरज आहे हे ठरू शकतं.



- हेअर पॅक केसांना कसा लावावा? : हेअर पॅक फक्त केसांच्या मुळांना लावून केसांना पोषण मिळेल असं अनेकांना वाटत असतं. पण असं मुळीच नाही हेअर पॅक नेहमी केसांच्या मुळापासून टोकापर्यंत लावावे. कारण स्काल्पप्रमाणेच तुमच्या संपूर्ण केसांना पोषण आणि स्वच्छतेची गरज असते. त्यामुळे केसांवर व्यवस्थित हेअर पॅक अप्लाय करा.
- हेअर पॅक किती वेळा लावावा? : हेअर पॅक किती वेळा केसांवर लावला तर केसांचे पोषण होते हा महत्त्वाचा प्रश्न असू शकतो. यासाठी नेहमी आठवड्यातून कमीत कमी दोन वेळा केसांना हेअर पॅक लावावा. हेअर पॅकमध्ये केस मऊ करणारे आणि केसांचे आरोग्य सुधारणारे गुणधर्म असतात. जसं अन्नातून केसांना पोषण मिळतं तसंच हेअर पॅकमधूनही केसांचे पोषण होत असतं. यासाठी आठवड्यातून दोनदा तरी केसांची अशी निगा राखायला हवी.

# साखरपुड्याला दिसा आकर्षक

**लग्नात करण्यात येणारे विधी सर्वात जास्त महत्त्वाचे असतात. तितकेच खास विधी असतात ते म्हणजे साखरपुड्याचे. लग्न असो वा साखरपुडा सर्वात जास्त लोकांचं लक्ष असतं ते म्हणजे नवरीवर. त्यामुळे या दोन्ही विधीमध्ये मेकअप खास असणे अत्यंत गरजेचे आहे. सुंदर, आकर्षक, बोल्ड आणि ग्लॅमरस अशी नवरी आपल्याला विविध ठिकाणी दिसून येते. साखरपुड्यांच्या विधींना सहसा होणारी नवरी ही लाईट मेकअप करणे अधिक सोयीस्कर समजते. तुमचाही लवकरच साखरपुडा होणार असेल आणि आपण अधिक आकर्षक दिसण्यासाठी कसा लुक करायचा याबाबत विचार करत असाल तर तुम्ही या लेखातून काही मेकअप आयडिया नक्कीच घेऊ शकता आणि तुमचा मेकअप लुक अधिक परफेक्ट बनवू शकता. हे मेकअप लुक्स लाईट असण्यासह नवरीला अधिक सुंदर दिसण्यासाठीही मदत करतात...**



आपल्या साखरपुड्याच्या कार्यक्रमाच्या वेळी तुम्ही अशा स्वरूपाचा मेकअप नक्कीच करू शकता. हा मेकअप लुक करण्यासाठी तुम्हाला तुमच्या आयब्रोज हायलाईट कराव्या लागतील आणि ओठांना लाल लिपस्टिक लावल्यानंतर ती अधिक बोल्ड असेल याची काळजी घ्या. डोळ्यांची सुंदरता वाढविण्यासाठी तुम्ही जाडसर आयलाईनर लावणे हा एक चांगला पर्याय आहे. असा मेकअप लुक तुमच्या आऊटफिटसाठीही योग्य ठरतो आणि नवरीला अधिक आकर्षक बनवतो. विशेषतः तुम्ही साखरपुड्यात लेहंगा घालत असाल तर हा तुमच्यासाठी परफेक्ट लुक आहे. हा मेकअप लुक करण्यासाआठी मिड टोन शॅडो लावून सुरुवात करा. एक सूक्ष्म स्मोकी बेस बनविण्यासाठी तुम्ही ग्रे अथवा ब्राऊन शेडचा पर्याय निवडा. लॅश लाईनवर लायनर लावा. लायनरच्या वर चारकोल अथवा स्मोकी मॅट ब्राऊन रंगाचा टोन शॅडो पुन्हा लावा. शॅडोच्यावर आणि खाली नीट मिक्स करा. खालच्या पापण्यांच्या बेसवर काजळ लावा आणि त्यावर खालची लॅशलाईन लावा. त्यानंतर स्मोकी रंगाच्या फिनिशिंगसाठी तुम्ही तुमच्या बोटांचा वापर करावा. स्मोकी आयमध्ये मस्कारा लावणे हादेखील महत्त्वाचा भाग असतो. मस्कारा लावण्याची पद्धत तुम्हाला माहीत नसेल तर ती माहीत करून योग्य स्वरूपात मस्कारा लावा. सर्वात शेवटी फिनिशिंग देण्यासाठी तुम्ही तुमच्या बोटांनी एक चमकदार शॅडो डोळ्यांच्या वर लावा आणि तुमच्या साखरपुड्याचा लुक होईल एकदम परफेक्ट!

# करेगुट्टा टेकड्यांवर २० नक्षलवाद्यांना कंठस्नान

## नक्षलवाद्यांच्या विरोधातल्या सर्वात मोठं ऑपरेशन

**गडचिरोली (प्रतिनिधी)** – भारतीय सैन्य आणि सुरक्षा दलांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक दिवस आहे. कारण एका बाजूला सैन्यानं अचूक रित्या हल्ला करत पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला धडा शिकवला आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर मध्यरात्री जोरदार आक्रमण करत 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम फत्ते केली आहे. तर दुसऱ्या बाजूला छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा टेकड्यांवर सुरक्षा दलांच्या गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या ऑपरेशनला यश मिळू लागले आहे. बुधवारी (७ मे) पहाटेपासून करेगुट्टाच्या टेकड्यांवर सुरक्षा दलांनी सुमारे २० नक्षलवाद्यांना कंठस्थान घातल्याची माहिती समोर आली आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, अद्याप छत्तीसगड सरकार, छत्तीसगड पोलीस, किंवा सीआरपीएफने या माहितीला दुजोरा दिलेला नाही. मात्र बिजापूर मधून मिळत असलेल्या माहितीप्रमाणे सकाळपासून सुरू असलेल्या चकमकीत मोठ्या प्रमाणावर नक्षलवादी मारले गेले आहे. ही संख्या २०च्या जवळपास असल्याचे ही सांगितले जात आहे. दरम्यान अजूनही चकमक सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याचीही शक्यता बळावली आहे.

**नक्षल्यांच्या मुळावर अखेरचा घाव?**

करेगुट्टाच्या डोंगराच्या या ऑपरेशनमध्ये सुरक्षा दलांना अद्याप फारसं यश मिळालं नसलं, तरी या ठिकाणी सुरक्षा दलाने ५०० पेक्षा जास्त नक्षलवाद्यांसह त्यांच्या सर्व मोठ्या कमांडर्सला घेरले आहे. या घेराबंदीचा काय महत्व आहे हे ओळखूनच सुरक्षा दल गेले पाच दिवस ४४ - ४५ अंश सेल्सिअस तापमानामध्ये सातत्याने धैर्य ठेवून करेगुट्टाच्या डोंगराला घेरा घालून थांबले आहे. अधून-मधून गोळीबार सुरू आहे. जर या ऑपरेशनच्या माध्यमातून सुरक्षा दल हिडमा आणि देवाला नामोहरम करण्यात किंवा अटक करण्यात यशस्वी ठरले, तर फक्त छत्तीसगडच नाही तर भारतातील नक्षलवादावर सुरक्षा दलांचे हे आजवरचा सर्वात मोठा आघात मानला जाईल.

दरम्यान, या ठिकाणी सर्वात जास्त धोकादायक मानला जाणारा आणि सहा कोटी रुपयांचे बक्षीस असलेला नक्षल कमांडर 'माडवी हिडमा' नक्षलवाद्यांच्या बटालियन १ सह घेरला गेला आहे. त्याच्यासोबत बटालियन १ चा कमांडर 'देवा बरसे सुक्का' आणि नक्षलवाद्यांसाठी शस्त्रांसह सर्व आवश्यक वस्तूंची सप्लाय चेन सतत कायम ठेवणारा 'दामोदर' ही सुरक्षा दलांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या विरोधातल्या देशातील आजवरच्या सर्वात मोठ्या ऑपरेशनमध्ये सुरक्षा दल यशस्वी ठरले, तर नक्षलवादावर हा देशातील सर्वात मोठा आघात ठरणार आहे.

# भारताची ऐतिहासिक भरारी; जपानला मागे टाकून भारत चौथ्या क्रमांकावर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– एकेकाळी विकसनशील देश म्हणून ओळखला जाणारा भारत आता जागतिक आर्थिक महासत्तांमध्ये आपली ठाम जागा निर्माण करत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक' अहवालानुसार भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून आपली नोंद केली आहे.

या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल महिन्यात भारताचा एकूण देशांतर्गत उत्पन्न म्हणजेच जीडीपी तब्बल ४.१८७ ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सवर पोहोचला आहे. या तुलनेत जपानची जीडीपी ४.१८६ ट्रिलियन डॉलर्स इतकी असून, अगदी थोड्याच फरकाने भारताने ही आघाडी घेतली आहे. हे केवळ क्रमवारीतील बदल नसून, भारताच्या आर्थिक प्रगतीचा हा एक ऐतिहासिक टप्पा ठरतो.

सध्या जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था अमेरिकेची असून तिची जीडीपी ३०.५०७ ट्रिलियन डॉलर्स इतकी आहे. त्यापाठोपाठ चीन १९.२३१ ट्रिलियन डॉलर्ससह दुसऱ्या स्थानावर आहे. जर्मनीची जीडीपी ४.७४४ ट्रिलियन डॉलर्स असून ती तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारत आता चौथ्या क्रमांकावर पोहोचला असून जपान पाचव्या स्थानी सरकला आहे. च्या अंदाजानुसार, भारत येत्या दोन वर्षांत ६ टक्क्यांहून अधिक वेगाने वाढणारी एकमेव मोठी अर्थव्यवस्था राहणार आहे. याउलट जपानमध्ये २०२५ आणि २०२६ दरम्यान फक्त ०.६ टक्के इतकीच मर्यादित आर्थिक वाढ अपेक्षित आहे. जागतिक व्यापारात निर्माण झालेल्या मंदीचा परिणाम जपानच्या निर्यातप्रधान अर्थव्यवस्थेवर झाल्याने ही मर्यादा निर्माण झाली आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटना व्दारे सूचित करण्यात येते की,माझे पक्षकार नाने. सदाशिव पि. शंकरराव पाटील रा. शहापूर ता.देगलूर यांनी श्री बाबाजी गंगाराम बाशेटवार रा. शहापूर ता. देगलूर यांच्याकडून कायदेशीरपणे ग. क्र. ४७२ मधील एक प्लॉट . १ गुंठा किंमत रू.,०००/– रु मध्ये लेखी करारनामाव्दारे हरेदीखत केले. व करारनाम्याच्या वेळेस बालाजीला बयानापोटी ६,००,०००/ दिले व करारनामा करुन घेतले व खरेदीखत दि. ४ / ११ / २०२२ पर्यंत करुन देण्याचा करार होता परंतू वर मुदतीत बाबाजी याने कराराची पूर्तता न केल्य मूळे शेवटी नाईलाजाने माझ्या पक्षकाराने त्या या विरुध्द विनोली येथील व. स्तर दिवाणी न्यायालय येथे वि. दि. दा क्र. १५/२०२३ हा दाखल केला त्या दाव्यात बालाजी हा हजर होवून उत्तर दिले नाही म्हणून शेवटी नाईलाजाने त्या दाव्याचा निकाल एकतर्फी मंजूरीला व माझ्या पक्षकाराच्या हक्कांत डिक्री दि. ६ / १२ / २०२४ रोजी बहाल केलो त्या डिक्रीमध्ये न्यायालयाने दोन महिन्या'' या आत उर्वरित रक्कम १५०,००० / भरल्यानंतर बालाजीला खरेदीखत नोंदवून देण्याविषयी आदेश केला. परंतू बालाजीने मुदतीत न्यायालयात आता नाही व खरेदीखत करून दिले नाही म्हणून माझ्या पढ़काराने त्या ''या विरुध्द दिवाणी न्यायालया' या आदेशाचे डिक्री नूसार वसूली कार्यवाही कि दरात ०२/२०२५ दाखल करून कोर्टाद्वारे खरेदोखा नोंदवून देण्याची विनंती केली. त्या प्रकरणाची नोटिस बालाजोला कोर्टाने पाठविती. नोटिसची माहिती झाल्यानंतर माझें पक्षकाराने खरेदी केलेले प्लॉट तो गावातील एका व्यक्तीसोबत विक्री करण्याचा करारनामा केला व तो वादातील प्लॉट ज्याचे न्यायालयात वाद चालू असतांना तो विक्री करण्याची शक्यता आहे. म्हणून या जाहिर प्रगटना दारे सर्व जनतेस आते सूचित करण्यात येते की कोणीही बालाजीच्या वर नमूद केलेल्या प्लॉट ची खरेदी विक्री व्यवहार त्या संदर्भात करु नये किंवा त्यवाबत कोणतेही व्यवहार पैसे देने पैने इत्यादी कर नये कारण त्याबाबत दिवाणी कोर्ट प्रस्तर विलोनी येथे बालाजीने करुन दिलेल्या करारनामानुसार कोर्टामार्फेत त्या प्लॉटचे खरेदीखत करून देणार आहे. असे असतांनम जर कोणी वाताजीच्या खोटया भूलथापास बळी पडून त्या संदर्भात कोणतेही व्यवहार पैसे देने होने करारनामा वैगेरे हे केल्यास त्यास स्वत: तो व्यक्ती जबाबदार राहिल व त्यास त्याचे नुकसान होइल म्हणून कोणत्याही व्यवहार त्या प्लॉटबाबत करु नये म्हणून जनहितार्थ हे जाहीर प्रगटन माझे पदेकार माझ्या तर्फे प्रसिध्द केले आहे त्याची गर्भीयाने त्याची दखल घ्यावी. करिता माहितीस्तव.

**मार्फत,**
**अॅड.के.इब्राहिम एम.कादरी**
**बिलोली मो.९७६४१७४९३९**

**जाहीर प्रगटन देणार**
**सदाशिव शंकरराव पाटील**
**रा.शहापुर ता.देगलूर जि.नांदेड**


# विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन डॉक्युमेट तयार करा

## १०० दिवस उपक्रमाचा टप्पा यशस्वी पूर्ण

**मुंबई (प्रतिनिधी)** – प्रशासनात लोकाभिमुखता आणणारा १०० दिवस या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला आहे. शंभर दिवसात सर्व विभागांनी चांगले काम केले आहे. आगामी १५० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कामकाजाचा निकाल २ ऑक्टोबर रोजी घोषित केला जाणार आहे या उपक्रमांतर्गतच 'विकसित भारत २०४७' च्या धर्तीवर 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन डॉक्युमेट तयार करा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मंत्रालयात १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमांबाबत प्रथम क्रमांक प्राप्त कार्यालयांचे सादरीकरण, राज्यस्तरांवरील सर्वोत्कृष्ट कार्यालयांना प्रशस्तिपत्र वितरण, धोरणात्मक बाबी कार्यक्रमासंदर्भात उत्कृष्ट काम केलेल्या मंत्रालयीन विभागांचा व अधिका-यांचा गुणगौरव सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार यासह मंत्रीमंडळातील सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शंभर दिवसांचा हा कार्यक्रम केवळ एक उपक्रम नव्हता, तर आपल्या शासनाची दिशा ठरवणारा महत्त्वाचा टप्पा होता. लोकाभिमुखता, कामकाजात सुलभता आणि जबाबदारी (अकाउंटेबिलिटी) या तीन आधारांवर प्रशासनात पुढे जाणे अत्यावश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत १० प्रमुख मुद्यांवर सादरीकरण करण्यात आले आणि त्या अनुषंगाने काम करण्यावर भर देण्यात आला. राज्यातील १२ हजार ५०० कार्यालयांना सुधारणा करण्याची संधी देण्यात आली. यामध्ये सर्व कार्यालयांनी सकारात्मक सहभाग दर्शवला आहे. याच उपक्रमांत राज्याच्या ४८ विभागांनी एक स्पर्धात्मक सादरीकरण सादर केले. प्रत्येक विभागाने स्वतः प्रश्नपत्रिका तयार केली व स्वतःच उत्तरंही दिली. १०० दिवसांमध्ये काय साध्य करणार हे स्पष्ट केले.

# राज्यपाल–मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत गोंडवाना विद्यापीठाचे लॉईड्स मेटल्स व ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठासोबत सामंजस्य करार

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचे लॉइड्स मेटल्स व एनर्जी तसेच पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांच्यासोबत सामंजस्य करारांचे राजभवन येथे आदानप्रदान करण्यात आले.



यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार डॉ. परिणय फुके, ऑस्ट्रेलियाचे मुंबईतील वाणिज्यदूत पॉल मर्फी, कर्टीन विद्यापीठाचे प्र–कुलगुरु मार्क ऑग्डन, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, लॉईड्स मेटल्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी प्रभाकरन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे तसेच विद्यापीठाचे संविधानिक अधिकारी व व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

गोंडवाना विद्यापीठ व लॉइड्स मेटल्स यांच्यामध्ये गडचिरोली येथे युवकांना धातुशास्त्र, खाणकाम, कॉम्प्युटर सायन्स व अन्य विषयातील अभियांत्रिकी प्रशिक्षण देण्यासाठी स्वायत्त 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' स्थापन करण्याबाबत करार करण्यात आला. तर गोंडवाना विद्यापीठ व पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांचेमध्ये जुळे कार्यक्रम (ट्विनिंग डिग्री) आयोजित करण्याबाबत करार करण्यात आला.

## बीडमधील दोन पोलीस कर्मचारी बडतर्फ

**बीड (प्रतिनिधी)** – मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा चर्चेत आहे. सरपंच संतोष देशमुख हत्यानंतर बीडमधील मारहाणीचे काही व्हिडीओ व्हायरल झाली. हेच नाही तर पोलिस प्रशासनावरही गंभीर आरोप करण्यात आली. आता त्यामध्येच बीड पोलिसांची प्रतिमा डागाळल्याने जिल्हा पोलीस दलातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले असून त्यांच्या विरोधात थेट कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केली आहे.

## केरळमध्ये पाऊस १ जूनला तर महाराष्ट्रात ७–८ जूनला होणार दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)**– मागील वर्षीप्रमाणे, यंदाही मान्सून शेतकऱ्यांना सुखावण्याची शक्यता आहे. मान्सूनवर एल निनो, ला निना किंवा हिंद महासागरातील द्विध्रुवीय घटकांचा परिणाम होणार नाही. त्यामुळे यंदाचा मान्सून नेहमीप्रमाणे सरासरी इतका आणि वेळेत दाखल होईल, अशी माहिती राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचे माजी संशोधक आणि मान्सून अभ्यासक डॉ. एम. आर. रमेश कुमार यांनी दिली आहे.

ते म्हणाले, स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याकडून मान्सूनचा पूर्व अंदाज वर्तवण्यात आला आहे. यापुढील अनुमान १५ मे दरम्यान व्यक्त करण्यात येईल.


## Change In Name

My old name is MOHAMMED KARIM MOHAMMEDAMIR IAM changing AS New Name. MD KARIM MD AMIR Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- R/O 1-7-868 PIRNAGAR NANDED 431601 DIST NANDED MAHARASHTRTA MO.7775939900

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## जाहीर प्रगटन

पी. विजयकुमार पोकर्णा यांनी दिलेल्या माहिती व अधिकारानुसार खाली-लप्रमाणे जाहीर प्रगटन सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. कपिल
प्रसिद्ध करण्यात येत आहे:
श्री. हरजी पी. संभाजी राजेगोरे, रा. पिंपळगाव (म.), ता. व जि. नांदेड यांच्या मालकीची व सीटीएस क्र. ११०४४ पैकी, नव्या मोंढा येथील दक्षिण भागातील उमरावसिंग बिसेन नगर, रामरतन ताब्यातील मालमत्ता, जी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे नांदेड येथील रेसिडेन्सी येथील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. २०३ आहे. सदर सदनिकेचे एकूण चटई क्षेत्रफळ ६०० चौरस फूट (अंदाजे ५५.७६ चौ. मी.) आहे. या सदनिकेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्वेस -श्री. किशनसिंग बिसेन यांचे निवासस्थान पश्चिमेस: लॉबी व रस्ता दक्षिणेसमोकळी जागा व त्यापुढे छायारतन रेसिडेन्सी,उत्तरेस -लिफ्ट व सदनिका क्र. २०२
वरील चतु:सीमेतील सदनिका श्री. हरजी पी. संभाजी राजेगोरे यांनी आमच्या पक्षकारांशी कायमस्वरूपी विक्री करण्याचा करार केलेला आहे. या करारानुसार आमच्या पक्षकारांनी इसारा रक्कम अदा केलेली आहे. तथापि, आमच्या पक्षकारांनी श्री. हरजी पी. संभाजी राजेगोरे यांना अनेकवेळा सदर मालमत्तेचा नोंदणीकृत खरेदीखत दस्त करून देण्याची विनंती केली असता, त्यांनी तसे करण्यास टाळाटाळ केली आहे.
आमच्या पक्षकारांना असे समजले आहे की, श्री. हरजी पी. संभाजी राजेगोरे हे वरील करार अस्तित्वात असताना सदर मालमत्ता तिसऱ्या व्यक्तीला विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरी याद्वारे सर्व संबंधितांना कळविले जाते की, श्री. हरजी पी. संभाजी राजेगोरे यांच्याशी सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. जर कोणी अशा प्रकारचा व्यवहार केल्यास, तो आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. अशा व्यवहारामुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर परिणामांसाठी संबंधित व्यक्ती स्वत: जबाबदार राहतील आणि त्यांना फौजदारी तसेच दिवाणी स्वरूपाच्या कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. याबाबत आमचे पक्षकार कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी. सदर जाहीर प्रगटन

**मार्फत,**
**अॅड.श्रीकांत ए.नेवरकर**
**गोदावरीनगर तरोडा खु नांदेड**
**मो.९८६०२०६१४४, ७५८८४३०८३८**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. मधुकरराव पि. कृष्णाराव बापट, रा. गांधीनगर, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथील रहिवाशी असुन जेष्ठ नागरीक आहे व माझ्या पक्षकाराचे मालकीचे व ताब्यात टिन/पत्रे एकुण ४ रुमचे घर बांधलेले आहे. ज्याचा घर क्र. ४४४ वार्ड क्र. ३ मध्ये आहे. त्याच्या चर्तु:सिमा सिमा येणे प्रमाणे आहेत पुर्वेस : शेरि गल्ली त्यास लागुन गंगाधर पि. बालाजी धातकर यांचे घर, पश्चिमेस :- मधुकर कुलकर्णी यांचे घर, दक्षिणेस : राजाराम रघुनाथ बापट यांची रिकामी जागा व उत्तरेस : सुरकूटवार यांचे घर आहे.
हे की, माझे पक्षकार हा जेष्ठ नागरीक असुन त्यास त्याचे उदरनिर्वाह करण्यासाठी कोणतेच साधन नाही त्यामुळे माझे पक्षकार हा त्याचे उदरनिर्वाहासाठी वर नमुद केलेल्या चर्तु:सिमेच्या आतील अंतर्गत व बाह्य हक्कासाठी कायमस्वरुपी विक्री करणार आहे. तरी ह्या जाहिर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यता येते की, ज्या कोणी व्यक्तिस ते घर विकत घ्यावयाचे आहे अशा व्यक्तींनी माझे पक्षकारास भेटुन किंवा त्यांचे वकिल अॅड.सावळे.एस.एम. जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड यांचेकडे प्रत्यक्ष भेटुन संपर्क करावा.
हे की, जर नमुद केलेल्या चर्तु:सिमेतील घरा बाबत कोणाचा कायदेशीर हक्क, हित संबंध असल्यास हे जाहिर प्रगटन दिल्यापासून १५ दिवसाचे आत कागदपत्रासह उजर नोंदवावा जर तसे कोणी उजर किंवा आक्षेप न केल्यास माझे पक्षकार हा कायदेशीररित्या त्या घराची विक्री करतील व त्यानंतर आ-लेला आक्षेप / उजर ग्राह्य धरल्या जाणार नाही.करीता हे जाहिर प्रगटण.

**मार्फत**
**अॅड.सावळे एस.एम.**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड**

**जाहीर प्रगटन देणार**
**श्री मधुकरराव पि.कृष्णाराव बापट**
**रा.गांधीनगर धर्माबाद ता.धर्माबाद**
**जि.नांदेड मो.९३२२०११३५२**

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**पत्ता:**– वजिराबाद, नांदेड ई-मेल पत्ता:info@nwcmcnanded.org दुरध्वनी (०२४६२) २३४०४

### ई निविदा सूचना क्रं. नांवाशमनपा /विद्युत/१७८२ /२०२५ दिनांक ७/५/२०२५

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याकडून अ वर्ग नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील झोन क्रं ५ येथील हैदरबाग UCHC हॉस्पीटल येथे नविन जनरेटर बसविणे या कामांसाठी ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब१ निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळ (http://mahatenders.gov.in) येथून डॉऊनलोड करण्यात यावी. तसेच निविद स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा अटी, शर्ती व ई निविदाची सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सूचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावरती कळविण्यात येईल.

**शहर अभियंता**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

## ई निविदा सुचना
## महाराष्ट्र शासन कृषि विभाग
### ई निविदा सुचना क्रं. ०६ सन २०२४–२५

उपविभागीय कृषि अधिकारी, किनवट यांचे कडून मा. बा. वि. महाराष्ट्र शासन यांचेकडील कल्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील नमुद केलेल्या कामांकरिता ऑनलाईन -१ निविदा आहेत. सदर निविदेची सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in या वेबसाई वेबसाईटवर दिनांक ०८.०५.२०२५ ते १४.०५.२०२५ पर्यंत कोरे निविदा मंत्र विक्रीसाठी राहतील

**टिप :** १) निविदेचे कोरे अर्ज आणि सविस्तर सुचना शासनाच्या WWW. MAHATENDERS.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदार यांनी संकेतस्थळावर जाऊन अर्ज ब्राइन मोड बाई, तत्पुर्वी निविदा शुल्क ई-निविदा अंतर्गत ऑनलाईन वेव - नेटार बन जाये २) कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देताना करण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सुवर्णमाला अशोक माहेवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-१३३ जुना वार्ड नं.- - मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.- ३५४,३५२,३५३,३४५ अधिनियमाअंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर --, लांबी पुर्व पश्चिम - चुर्तसिमा पुर्वे -६ मीटर रूंद रोड, पश्चिम: रिकामी जागा, दक्षिण : ६.१० मीटर रूंद रोड, उत्तर :६.१० मीटर रूंद रोडहद्द वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अविनाश अशोक रेड्डी यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-४५३ जुना वार्ड नं.- मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-१७७५ गुंठेवारी अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -, लांबी पुर्व पश्चिम - चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १८, पश्चिम: ६.१० मीटर रूंद रोड, दक्षिण :प्लॉट नंबर २८, उत्तर :प्लॉट नंबर २६ वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अशोक गोपाळराव गठेवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-- जुना वार्ड नं.- मधील प्लॉट नंबर - मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर , लांबी पुर्व पश्चिम चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ३/२२२, पश्चिम: ६.१० मीटर रूंद रोड, दक्षिण : ६.१० मीटर रूंद रोड, उत्तर :६.१० मीटर रूंद रोड वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,जोत्सना संदीपराव पाटील यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-२५५ जुना वार्ड नं.- मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-२०५८/३ गुंठेवारी अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -, लांबी पुर्व पश्चिम - चुर्तसिमा पुर्वे -सरकारी पांदण, पश्चिम: प्लॉट नंबर ४५, दक्षिण :प्लॉट नंबर १२, उत्तर :६.१० मीटर रूंद रस्ता वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,इंदुताई गोविंद सुरकुठवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-५१४ जुना वार्ड नं.- मधील प्लॉट नंबर -५ मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-१२८८ गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -, लांबी पुर्व पश्चिम - चुर्तसिमा पुर्वे -६.१० मीटर रूंद रस्ता, पश्चिम: प्लॉट नंबर २, दक्षिण : प्लॉट नंबर १४, उत्तर :प्लॉट नंबर १६ वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अब्दुल माजीद अब्दुल अकबर यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-२६५ जुना वार्ड नं.- ४ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-७८६ गुंठेवारी अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर ४५ फुट -, लांबी पुर्व पश्चिम - ३३ फुट चुर्तसिमा पुर्वे -रेल्वे स्टेशन रस्ता, पश्चिम: खाजा अहेमद, दक्षिण :खाजा खुदबोद्दीन, उत्तर :शेरी वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टुम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर
समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेड रेल्वेस्थानकात युद्धसदृश्य स्थितीचा थरार

## मॉक ड्रीलची पूर्वकल्पना दिल्याने प्रवाशांचा जीव भांड्यात




**नांदेड (प्रतिनिधी)** – भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राइक करून दहशतवादी अड्ड्यांचा खात्मा केला आहे. युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने नांदेडच्या हजूर साहिब रेल्वे स्थानकावर मॉक ड्रील बुधवारी (दि. ७) सकाळी पर्यटक व रेल्वे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून मॉक ड्रिल घेण्यात आले आहे. लोहमार्ग पोलीस, नांदेड पोलीस व एटीएस, क्यूआरटीचे जवान, श्वानपथक, फायर ब्रिगेड यांनी संयुक्तपणे मॉक ड्रीलमध्ये सहभाग घेतला. प्रवाशांना या मॉक ड्रीलची पूर्वकल्पना देण्यात आल्याने प्रवाशांनी यावेळी युद्धजन्य परिस्थिती अनुभवली.

बुधवारी रेल्वेस्थानक नांदेड येथे महिला विश्रामगृहात घुसलेल्या दोन अतिरेक्यांना नांदेड जिल्हा पोलीस दलातील जलद प्रतिसाद पथकाने पकडून दहशतवाद विरोधी पथकाच्या ताब्यात दिले आहे.

लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस अधिक्षक स्वाती भोर, नांदेडचे पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि लोहमार्गचे पोलीस उपअधिक्षक संजय लोहकरे यांच्या आदेशानुसार रेल्वे स्थानकावरील रंगीत तालीम घेण्यात आली. त्यात बुधवारी सकाळी ११.१५ वाजता रेल्वे स्थानक नांदेड येथील फलाट क्रं. १ वर असलेल्या महिला विश्रामगृहामध्ये दोन अतिरेकी घुसल्याची माहिती लोहमार्ग येथील सहाय्यक पोलीस निरिक्षक हनमंत पांचाळ यांना प्राप्त झाली. त्यांनी लगेच नांदेड जिल्हा पोलीस दलाला याबद्दलची माहिती दिली. तेंव्हा क्युआरटी पथकाचे अधिकारी बोधगिरे, तसेच ३३ पोलीस अंमलदार, पोलीस निरिक्षक सौ. तोटवान, डाकेवाड, चार पोलीस अंमलदार, सीबा श्वान, पोलीस निरिक्षक दत्ता केंद्रे, एटीएसच्या सहाय्यक पोलीस निरिक्षक अनिता चव्हाण, पोलीस अंमलदार अकबर पठाण, जितेंद्रसिंह जालनावाले, गायकवाड, खय्युम, प्रल्हाद मिना, माधवराव, लनावाले, गायकवाड, खय्युम, प्रल्हाद मिना, माधवराव, नांदेड रेल्वे डिव्हिजनचे अधिकारी व अंमलदार, अग्नीशमन दलाचे प्रमुख निलेश कांबळे व त्यांचे अधिकारी आणि चार कर्मचारी, सोबत वैद्यकीय अधिकारी मयुर तिवारी यांच्यासह एक रुग्णवाहिका, दंगा नियंत्रण पथक रेल्वे स्थानकावर क्षणाधार्थ पोहचले.

अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने नांदेडच्या जलद प्रतिसाद पथकाने आपल्या एके ४७ रायफलीच्या मदतीने त्यांनी महिला विश्राम कक्षात दबा धरुन बसलेल्या दोन्ही अतिरेक्यांना जेरबंद करून दहशतवाद विरोधी पथकाच्या ताब्यात दिले.

रेल्वे स्थानकावर या कार्यवाहीचा गोंधळ होवू नये म्हणून मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्ये ध्वनीक्षेपकावरुन सुचना दिल्या जात होत्या. या कार्यवाहीत एकूण १२ अधिकारी आणि ५२ पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला होता.

# इतवारा पोलिसांच्या कारवाईनंतर सहा महिन्यांसाठी तिघे जिल्ह्यातून हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी)**– सातत्याने गुन्हेगारी करून शहरात दहशत निर्माण करणाऱ्या तीन जणांना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यासाठी हद्दपार करण्यात आले आहे. इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यावरून अबिनाश कुमार यांनी या तिघांना सहा महिन्यांसाठी हद्दपार केले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सूव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणारे सराईत आरोपीची यादी तयार करून, आरोपी विरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन देखील त्यांचे वर्तणात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेदारांकडून सराईत गुन्हेगाराना हद्दपार तसेच स्थानबध्द करण्यासंबंधाने कार्यवाही चालु आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चालू वर्षामध्ये, हद्दपार व एमपीडी अंतर्गत एकूण २१ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले तर चार गुन्हेगारांना कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सन २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे एकूण ७६ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे मोहम्मद अरबाज मोहम्मद एजाज वय २०, व्यवसाय मजुरी रा. बालाजी नगर हिंगोती नाका, नांदेड, मोख अयान शेख अमजद वय १९, व्यवसाय बेकार रा. नुरीचीक महेबुबनगर, नांदेड आणि मोहम्मद इस्माईल अब्दुल हमीद वय २१, व्यवसाय मजुरी रा. खुदबेनगर चौरस्ता देगलुर नाका, नांदेड यांना हद्दपार करण्यात आले आहे. कायद्याचा आदर करणारे शांतता प्रिय नागरीकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलीसांची बारकाईने नजर असून अशा गुन्हेगारांवर हद्दपार तसेच स्थानबध्द सारखी कठोर कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील तीनही सराईत गुन्हेगारांच्या टोळी विरुद्ध नांदेड जिल्ह्यामध्ये गंभीर स्वरुपाचे दखलपात्र गुन्हे दाखल असल्याने इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित भोईटे यांच्याकडून वरील तीन गुन्हेगारांविरुद्ध म.पो.का. कलम ५५ अंतर्गत हद्दपार करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्याकडे सादर करण्यात आला होता. प्रस्तावामध्ये कांही उणीवा राहणार नाहीत या करीता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी महत्वपूर्ण कामकाज पाहिले आहे. त्याचबरोबर उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक यांनी सदर प्रस्ताव पोलीस अधिक्षकांना सादर केला. अबिनाश कुमार यांनी सदर हद्दपार प्रस्तावाची पुन्हा सखोल चौकशी करुन प्रस्तावातील तिन्ही सराईत गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यांकरीता हद्दपार करण्याबाबतचे आदेश दि. ६ मे रोजी जारी केलेले आहेत.

# धनमुद्रा चीटफंडच्या नावाखाली ग्राहकांची १६ लाखांची फसवणूक; वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील गुरुकृपा मार्केट येथील एका कार्यालयातील धनमुद्रा चीटफंड या वित्तीय संस्थेच्या नावाखाली बीसीच्या नावे महिनेवारी कमिशन घेऊन १६ लाख तीस हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी गजानन वट्टमवारविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील गुरुकृपा मार्केट येथे धनमुद्रा चीटफंडचे कार्यालय आहे. या कार्यालयात चार मे २०१७ ते डिसेंबर २०२१ दरम्यान वित्तीय संस्थेच्या नावाखाली आरोपी गजानन पांडुरंग वट्टमवार रा. शिवाजीनगर, नांदेड याने फिर्यादी अरुण ग्यानोबा वट्टमवार (वय ६३) रा. सोमेश कालनी व त्याच्या अन्य सहकाऱ्यांची बीसीच्या महिनेवारी कमिशनमधून अकरा लाख तीस हजार व अरुण वट्टमवार यांचे एकट्याचे पाच लाख असा १६ लाख ३० हजार रुपयांचा अपहार करून विश्वासघात केला.

विशेष म्हणजे धनमुद्रा चीटफंड नावाने पावत्या देऊन त्यांचा विश्वासघात करून फसवणूक केली. या प्रकरणी अरुण ग्यानोबा वट्टमवार यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गजानन वट्टमवारविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लोंढे करत आहेत.

# मित्राचा खंजरने भोसकून खून; मारेकऱ्याला कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या बाफना परिसरातील एका ऑटोमोबाईल्सच्या दुकानावर बॅटरी चोरल्याचे मालकास का सांगितले याचा राग मनात धरून मित्राचा खंजरने भोसकून खून केला. ही घटना शहराच्या स्वस्तिक बॅटरी दुकानासमोर मंगळवारी (दि.६) सायंकाळी घडली. वजिराबाद पोलिसांनी मारेकऱ्यास पकडून बुधवारी (दि.७) रोजी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने ९ मेपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

बाफना परिसरात असलेल्या स्वस्तिक बॅटरी या दुकानावर कृष्णा काशिनाथ पुयड (वय २०) रा. पुणेगाव ता. नांदेड आणि विशाल गणेश ढोकळे रा. दत्तनगर हे दोघेजण काम करत होते. विशाल ढोकळे याने दुकानातील बॅटरी चोरली होती. ही बाब कृष्णाने दुकान मालकास सांगितली. त्यामुळे दुकान मालकाने गणेश ढोकळे याला जाब विचारला होता. एवढेच नाही तर त्याला नोकरीहून सुद्धा काढले होते. त्यानंतर कृष्णा पुयड याने माझी चोरीची घटना दुकान मालकाला का सांगितली याचा राग मनात धरून होता. अखेर त्याने मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास आपल्याच दुकानासमोर कृष्णा पुयड याच्यासोबत वाद घातला आणि खंजरने भोसकून कृष्णाचा खून केला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांचे अन्य सहकारी यांनी घटनास्थळाला भेट दिली. त्यानंतर फॉरेन्सिक टीमही त्या ठिकाणी पोहोचली. काशिनाथ पुयड यांच्या फिर्यादीवरून आरोपी विशाल ढोकळेविरुद्ध खून आणि भारतीय हत्यार कायद्यांतर्गत वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लोंढे करत आहेत.

# रविवारपासून व्यक्तिमत्त्व विकास वर्ग व संस्कार शाळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– ज्ञानेश्वर अभ्यास मंडळ नांदेड आयोजित व्यक्तिमत्त्व विकास वर्ग आणि संस्कार शाळाची सुरुवात ११ मे रविवारपासून होत आहे. या वर्गामध्ये ५ वी ते ८ वी वर्गात जाणाऱ्या मुला मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे.

सकाळी ९ ते ११ या वेळात होणाऱ्या या वर्गासाठी फक्त २५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असून यामध्ये शिष्टाचार व नम्रता, देहबोली, शारीरिक हावभाव व संकेत, श्रवण कौशल्य, निरीक्षण कौशल्य, संवाद कौशल्य, भाषण कौशल्य, कथाकथन, मुलाखत तंत्र, वेळेचे नियोजन, स्मरणशक्ती आदींचे प्रात्यक्षिकासह अनुभव प्रदान करण्यात येणार आहे. साईलीला', १३, स्वातंत्र्यसैनिक नगर, शारदा नगर जवळ नांदेड, या ठिकाणी होणाऱ्या या वर्गाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक प्रा. सु. ग. जाधव व ॲड. ओंकारेश्वरी कदम यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२३१४०७४१ या क्रमांकावर संपर्क साधावा लागणार आहे.

# दोन चोरटे नांदेड ग्रामीण पोलिसांच्या तावडीत; चोरीचे वाहनही जप्त




**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरातून दुचाकी व अन्य वाहनांची चोरी करून फरार असलेले दोन चोरट्यांना नांदेड ग्रामीण पोलिसांनी सोलापूर येथून अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीची चार चाकी गाडीही जप्त केली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना दुचाकी व अन्य वाहने चोरीच्या गुन्ह्या संदर्भात आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण गु.रं.न. ३२२/२०२५ कलम ३०३ (२), ३५१(२), ३५१(३), ३ (५) भारतीय न्याय संहीता-२०२३ दाखल गुन्ह्यातील आरोपींना अटक केली आहे.

अशोक मधुकर मुंडे यांची ऑमीनी व्हॅन (एमएच ४४ यु ३८२४) दि. १४ मार्च २०२५ रोजी वेळ रात्री आठ ते नऊ वाजण्याचे सुमारास आरोपी सर्जेराव उर्फ रोहित दत्तात्रय पाटील (वय ३४, रा.करोळे ता. पंढरपूर) आणि तुकाराम नामदेव मेहेत्रे (वय २७, रा. पांढरेवाडी ता. पंढरपूर) यांनी वाडीपाटी हॉटेलसमोर चहा पिण्यासाठी थांबवलेली असता चोरून नेली होती.

गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व सोबत गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांनी आरोपीचा शोध घेतला असता ते दोघेही करोळी (ता. पंढरपुर) येथे असल्याची गुप्त माहिती मिळाली. या दोन्ही आरोपींना करोळी (ता. पंढरपूर) येथून अटक करून त्यांच्या ताब्यातील वाहनही जप्त केले आहे. सदर गुन्हयांचा तपास पोलीस उपनिरीक्षक मटवाड करत आहेत.

## पत्रकार मुबीन कामरानी यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील युवा पत्रकार मुबीन कामरानी यांचे सोमवारी रात्री निधन झाले. ते कर्करोगाने त्रस्त होते. त्यांच्यावर नांदेड, हैदराबाद आणि मुंबई येथील विविध रुग्णालयात उपचार करण्यात आले. ५ मे रोजी रात्री ११ च्या सुमारास त्यांचे निधन झाले. ६ मे रोजी गाडीपुरा येथील बडी दर्गा मशिद शेजारच्या कब्रस्तानात त्यांचा दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले, पत्नी, आई वडील, पाच भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.



पान १ वरून...

**राज्यात अव्वलस्थानी...**

हा कार्यक्रम नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्यप्रणालीद्वारे अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड कार्यालयास पुरस्कार मिळाल्याबाबत व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना हा सन्मान प्राप्त झाल्याबाबत सर्व कर्मचाऱ्यांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.

# पनवेल आणि पुणे एक्स्प्रेसमध्ये दोन डब्यांची वाढ आणि अंबाअंदुरा एक्स्प्रेसमध्ये तीन डब्यांची कायमस्वरूपी वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)** – उन्हाळ्यातील प्रवाशांची गर्दी पाहता दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड-पनवेल-नांदेड आणि नांदेड- पुणे- नांदेड एक्स्प्रेसमध्ये दोन डब्यांची वाढ केली आहे. तसेच नांदेड-अंबाअंदुरा-नांदेड एक्स्प्रेस मध्ये तीन डब्यांची वाढ कायम करण्यात आली आहे.

गाडी क्रं. १७६१४ / १७६१३ हजूर साहिब नांदेड पनवेल हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसमध्ये दोन तृतीय श्रेणी वातानुकुलीत (३एसी) असे दोन डब्बे नांदेड सुटणाऱ्या गाडीत १ मेपासून आणि पनवेल येथून सुटणाऱ्या गाडीत २ मेपासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत.

गाडी क्रं. १७६३० / १७६२९ हजूर साहिब नांदेड -पुणे-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसमध्ये दोन तृतीय श्रेणी वातानुकुलीत (३एसी) असे दोन डब्बे हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत दि. ३ मेपासून आणि पनवेल येथून सुटणाऱ्या गाडीत दि.४ मेपासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढीनंतर या दोन्ही एक्स्प्रेस गाडीत डब्यांची एकूण संख्या १७ झाली आहे.

गाडी क्रं. २२७०९ / २२७१० हजूर साहिब नांदेड -अंबा अंदुरा - हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसमध्ये एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत (३एसी) आणि २ द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) चे डब्बे असे तीन डब्बे हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत दि. २९ एप्रिल पासून आणि अंबाअंदुरा येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १ मेपासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. त्यामुळे या वाढीनंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या १८ झाली आहे.

**नांदेड– निजामुद्दीन– नांदेडमध्ये तीन डब्यांची वाढ**

गाडी क्रं. ०७६२१ / ०७६२२ हजूर साहिब नांदेड निजामुद्दीन हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस मध्ये एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत (३ एसी) आणि ०२ द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) चे डब्बे असे तीन डब्बे हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १० मे २०२५ पासून आणि निजामुद्दीन येथून सुटणाऱ्या गाडीत दि. ११ मे २०२५ पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढी नंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या १८ झाली आहे.

**नांदेड– पटना एक्स्प्रेसमध्ये तीन डब्यांची तात्पुरती वाढ**

गाडी क्रं. १७६१० हजूर साहिब नांदेड पटना एक्स्प्रेसमध्ये एक द्वितीय श्रेणी वातानुकुलीत (२ एसी), एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत (३ एसी) आणि ०१ द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) चे डब्बे असे तीन डब्बे दि.८ मे २०२५ हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत तातपुरत्या स्वरुपात वाढविण्यात आले आहेत.

# नांदेड जिल्ह्यात आज, उद्या महाराणीची रथयात्रा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रीय समाज पक्षा तर्फे महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीमहोत्सवा निमित्ताने १९ एप्रिल २०२५ रोजी महाराणीचे जन्मस्थळ चौंडी (ता. जामखेड जि.अहिल्यानगर) येथून महाराणी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची रथयात्रा निघालेली आहे. ही रथयात्रा गुरुवारी दि. ८ मे रोजी नांदेड जिल्ह्यात रथयात्रा माळेगांव यात्रा येथे दुपारी ४वाजता वाजता येणार आहे.

महाराणी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची रथयात्रा पुढे माळाकोळी, पोलेवाडी, लोहा, कंधार मार्गे मुखेड येथे संध्याकाळी ६ वाजता मुक्कामी जाणार आहे.

दि. ९ मे रोजी मुखेड येथून सकाळी ७ वाजता निघून चांडोळ, बोरगाव, मंडलापुर, पाळा, हासनाळ, चौंडी, खानापुर मार्गे ९ वाजता देगलुर जाणार आहे. पुढे देगलुर, वझरगा, टाकळी -अटकळी, केरूर, बिजुर, धुपा, किनाळा, नर्सी, नायगाव, घुंगराळा, कुष्णुर, कहाळा, वाका, मारतळा, कांकाडी, तुप्पा मार्गे दुपारी १ वाजता गोपाळचावडी सिडको नांदेड येथे पोहचणार आहे.

नांदेड शहरात वसरणी, कौठा, वजिराबाद चौक, शिवाजी नगर, विश्रांती गृह, फावडे वाडी नाका, काबरा नगर, छत्रपती चौक, तरोडा नाका, चैतन्यनगर, सांगवी, मार्गे मुगुट मुदखेड, ३ वाजता भोकरकडे मार्गस्थ होणार आहे. पुढे भोकर, धावरी, तामसा, हदगाव, पळसा, वारंगा मार्गे संध्याकाळी ८ वाजता हिंगोली येथे मुक्कामी राहणार आहे.

महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, हरियाणा, उत्तरप्रदेश, दिल्ली करून ३१ मे २०२५ रोजी होळकर सैन्याचे छावणीचे ठिकाण तालकटोरा दिल्ली येथे या रथयात्रेचा समारोप होणार आहे. रथयात्रेच्या मार्गावर स्वागतासाठी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन नांदेड जिल्हा रथयात्रा संयोजक नांदेड शहर महानगराध्यक्ष आर. जे. तुडमे, दक्षिण जिल्हाध्यक्ष आनंद राजूरे, उतर पुर्व जिल्हाध्यक्ष भिमराव शेळके यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com